**अतारांकित प्रश्नोत्तरांची ३८ वी यादी**

# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## राज्यातील पोलीस उपनिरीक्षक, राज्य कर निरीक्षक, दुय्यम निबंधक व कर सहाय्यक पदांच्या रिक्त जागा भरण्याबाबत

**(१) ४८ (२७-०४-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस दलात २ लाख २१ हजार २५९ मंजूर पदांपैकी सुमारे ३३ हजारांवर पदे रिक्त असून त्यात उपनिरीक्षक पदाच्या सुमारे २९५९ जागा, राज्य कर निरीक्षक पदाच्या ९६३, दुय्यम निबंधक पदाच्या ४०, कर सहाय्यक पदाच्या १५३७ जागा तसेच पोलीस दलात २ लाख २१ हजार २५९ मंजूर पदांपैकी सुमारे ३३ हजारांवर पदे रिक्त असून त्यात महिला पोलिसांच्या १६.६ टक्के पदांचा समावेश असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात पोलीस उपनिरीक्षक पदांच्या जागा रिक्त असताना महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत घेण्यात येणाऱ्या राज्य लोकसेवा अराजपत्रित गट ब परीक्षा २०२४ साठी पोलिस उपनिरीक्षक पदाच्या केवळ २१६ जागांची जाहिरात देण्यात आल्याचे तसेच राज्य कर निरीक्षक, दुय्यम निबंधक, कर सहाय्यक या पदांसाठी पुरेशा जागांचा जाहिरातीत समावेश नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील पदांच्या जागा रिक्त असताना देखील सदरील परिक्षेत मात्र पुरेशा जागांची जाहिरात देण्यात आली नाही तसेच राज्य लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेचा नवीन पॅटर्न सुरु होण्यापूर्वी सदर रिक्त जागा भरल्या जाव्यात अशी बेरोजगार तरुणांची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त जागांची माहिती व निर्णय घेऊन त्वरीत भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०४-२०२६) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील पोलीस दलामध्ये मंजूर पदांपैकी सुमारे ३३ हजारांवर पदे रिक्त आहेत ही वस्तुस्थिती नाही.

पोलीस दलामध्ये एकूण २,२२,२६१ मंजूर पदे आहेत. सदर पदांमधील २,०६,२८१ पदे भरलेली असून १५,९८० पदे रिक्त आहेत.

पोलीस उपनिरिक्षक, राज्य कर निरीक्षक, दुय्यम निबंधक, कर सहायक या संवर्गामधील रिक्त पदांचा समावेश सन २०२३, २०२४, २०२५ आणि २०२६ मध्ये होणाऱ्या परीक्षांमध्ये करण्यात आलेला आहे.

राज्य पोलीस दलामध्ये पोलिस उपनिरीक्षक संवर्गामध्ये सरळसेवेची १,२३५ पदे रिक्त असून सदर पदांपैकी सन-२०२१, २०२२ व २०२३ वर्षीच्या परीक्षांमध्ये एकूण १,१८७ पदांची भरती प्रक्रिया पूर्ण झाली आहे. सन-

२०२४ च्या परीक्षेमध्ये २१६ पदांच्या भरतीची प्रक्रिया सुरु आहे.

(३) हे खरे नाही,

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परीक्षेसाठी वर्णनात्मक परीक्षेचा नवीन पॅटर्न सुरु करण्यात आला आहे, सदर पॅटर्न प्रश्नामध्ये नमूद गट-ब (अराजपत्रित) आणि गट-क पदांसाठी लागू नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्हातील वीज ग्राहकांना स्मार्ट मीटर नको असल्याबाबत**

**(२) १०१ (२६-०४-२०२५). श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा हा आदिवासी जिल्हा म्हणून घोषित असतानाही येथील वीज ग्राहकांना स्मार्ट मीटर बसवण्यात येणार असल्याने ग्राहकांना मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण होणार असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण कंपनीमार्फत घरगुती व औद्योगिक वापरासाठी स्मार्ट मीटर बसवण्यात येणार असल्याने हे स्मार्ट मीटर वेळेत रिचार्ज न केल्यास सर्व ग्राहकांना नाहक त्रास होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालघर जिल्ह्यासह राज्यात महावितरणामार्फत बसवण्यात येणारे स्मार्ट मीटरची योजना स्थगित करुन पूर्वीप्रमाणेच विजेची जोडणी सुरु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

पालघर जिल्हयात वीज ग्राहकांना स्मार्ट मीटर बसविताना मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण होणार आहेत, अशा आशयाच्या बातम्या माहे जानेवारी, २०२५ मध्ये स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्याचे आढळून आले आहे. परंतु सदर स्मार्ट मीटर हे सध्याच्या प्रचलित पोस्टपेड पध्दतीने लावण्यात येत असल्याने ग्राहकांना कुठल्याही समस्या निर्माण होणार नाहीत.

महावितरण अंतर्गत सुरू असणाऱ्या विविध सौर वीजेच्या योजनांमुळे अतिरिक्त सौर वीज उपलब्ध होणार आहे. तसेच घरगुती ग्राहकांना Solar Hours मध्ये ८० पैसे प्रती युनिट सवलत देण्यात येत आहे. सदर सवलतीचा लाभ घेण्यासाठी स्मार्ट मीटर बसविणे गरजेचे आहे. तसेच स्मार्ट मीटर लावल्यामुळे ग्राहकांना अचुक बिल देण्यास मदत होत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दिवा (मुंबई) स्थानकातून चालविली जाणारी दादर-रत्नागिरी ही पॅसेंजर रेल्वे गाडी सुरु करण्याबाबत**

**(३) १२५ (२६-०४-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवा (मुंबई) स्थानकातून चालविली जाणारी दादर-रत्नागिरी ही पॅसेंजर रेल्वे गाडी बंद करून मध्य रेल्वे प्रशासनाने त्याचवेळेत दादरहून गोरखपूर आणि बलियासाठी नव्या गाडया माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान सुरू केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोकणातील सर्वसामान्य जनतेला प्रवासासाठी आर्थिकदृष्ट्या परवडणारी सदर पॅसेंजर गाडी बंद करण्यात आल्याने प्रवाशी तसेच प्रवासी संघटनांमध्ये संतापाचे वातावरण असून त्यांनी सदर गाडी पुन्हा सुरू करून ती दादर रेल्वे स्थानकावरूनच सोडण्यात यावी, अशी मागणी रेल्वे प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दादर-रत्नागिरी ही पॅसेंजर रेल्वे गाडी सुरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०१-०४-२०२६) :** (१), (२) व (३) रेल्वे हा केंद्रीय सूचीमधील विषय आहे.

दादर-रत्नागिरी पॅसेंजर पुर्ववत सुरु करावी व आगामी गणेशोत्सव, होळी व इतर सणावारासाठी केवळ कोकणातील चाकरमान्यांसाठी जादा गाड्या सुरु कराव्यात यासंदर्भात मा.मंत्री(परिवहन) यांच्या दालनात दिनांक ०९.०७.२०२५ रोजी रेल्वेच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत, दादर टर्मिनलवर ट्रॅक आणि प्लॅटफॉर्मची कमतरता असल्याने, ट्रेन क्रमांक ५०१०३/२०१०४ दिवा-रत्नागिरी-दिवा पॅसेंजर दिवा येथे स्थानांतरित करण्यात आली असल्याने तसेच, विविध सण आणि सुट्टीच्या प्रसंगी वेळोवेळी मुंबईहून कोकण प्रदेशात मुंबई आणि रत्नागिरी दरम्यान विशेष गाड्या चालविण्यात येतील, असे रेल्वेच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

याप्रकरणी, रेल्वे विभागाने सादर केलेल्या माहितीनुसार, माहे जानेवारी, २०२५ पासून दादर ते गोरखपूर आणि बलिया अशी कोणतीही नवीन ट्रेन सुरु केलेली नाही. ट्रेन क्रमांक ०१०२५/०१०२६ दादर ते बलिया आणि गाडी क्र. ०१०२७/०१०२८ दादर ते गोरखपूर ही दादर आणि गोरखपूर दरम्यान टीडीओ स्पेशल म्हणून धावत आहे. दादर स्थानकात टर्मिनल येथे सुविधांचा अभाव आहे. दादर स्थानकात फक्त १७ (ICF) कोच क्षमतेचे दोन लहान टर्मिनल प्लॅटफॉर्म आहेत. दादर येथे प्लॅटफॉर्म आणि स्टेबलिंग लाईन्सची कमतरता आणि सेक्शनल क्षमतेचा अभाव यामुळे अलिकडच्या काळात दादर टर्मिनलवर कोणत्याही नवीन मेल/एक्सप्रेस गाड्या सुरु झालेल्या नाहीत. मुंबई विभागाच्या उपनगरीय विभागात, दादर/सीएसएमटी/एलटीटी येथे ट्रॅक, प्लॅटफॉर्म आणि स्टेबलिंग लाईन क्षमतेची तीव्र कमतरता आहे. मुंबई प्रदेशात दररोज एकूण १,८१० उपनगरीय सेवा चालतात, त्यापैकी ७९६ उपनगरीय सेवा दादर स्थानकावर धीम्या आणि जलद मार्गांवर दोन्ही दिशांना थांबतात आणि ४९० उपनगरीय सेवा दिवा स्थानकावर धीम्या आणि जलद मार्गांवर दोन्ही दिशांना थांबतात.

दादर आणि दिवा दरम्यान २४ तासांच्या कालावधीत २११ उपनगरीय सेवा चालतात, त्यापैकी २३ उपनगरीय गाड्या दुपारी ३:०० ते ५:०० दरम्यान उपलब्ध असतात, ज्या दिवा येथून १७:५० वाजता सुटणाऱ्या ट्रेन क्रमांक ५०१०३ दिवा-रत्नागिरी पॅसेंजरशी जोडल्या जाऊ शकतात. दिवा-दादर दरम्यान २४ तासांत २२१ उपनगरीय गाड्या दुपारी १:२५ ते दुपारी ३:०० दरम्यान उपलब्ध असतात. ५०१०४ रत्नागिरी-दिवा पॅसेंजर ट्रेन दिवा येथे दुपारी १:२५ वाजता पोहोचते.

ट्रेन क्रमांक ०१०२७/०१०२८ दादर-गोरखपूर-दादर एक्सप्रेस (स्पेशल) गेल्या काही वर्षांपासून धावत आहे. सध्या, गर्दी कमी करण्यासाठी कुर्ला ते सीएसएमटी पर्यंत ५ व्या आणि ६ व्या मार्गावर काम सुरु आहे. ५ व्या आणि ६ व्या मार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर, ५ व्या आणि ६ व्या मार्गावरील गाड्या सीएसएमटी पर्यंत धावू शकतील आणि कुर्ला ते सीएसएमटी दरम्यान ५ व्या आणि ६ व्या मार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर, ट्रेन क्रमांक ५०१०३/५०१०४ दिवा-रत्नागिरी-दिवा पॅसेंजर दिवा ते दादर पर्यंत वाढवण्याची व्यवहार्यता तपासली जाईल. असे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

मुंबई आणि रत्नागिरी दरम्यान एकूण ४३ जोड्या गाड्या धावत आहेत, ज्या सध्याच्या वाहतुकीच्या पातळीला तोंड देण्यासाठी पुरेशा आहेत. गेल्या तीन वर्षांत, मुंबई ते कोकण प्रदेशातील कनेक्टिव्हिटी आणखी वाढवण्यासाठी खालील गाड्या सुरु करण्यात आल्या आहेत:-

अ) ट्रेन क्रमांक २२२२९/२२२३० सीएसएमटी-मडगाव-सीएसएमटी वंदे भारत एक्सप्रेस २८.०६.२०२३ पासून.

ब) ट्रेन क्रमांक १०११५/१०११६ वांद्रे टर्मिनस-मडगाव-वांद्रे टर्मिनस (आठवड्यातून दोनदा) एक्सप्रेस ०३.०९.२०२४ पासून.

क) ट्रेन क्रमांक ११०९९/११००० एलटीटी-मडगाव-एलटीटीची वारंवारता ०४.११.२०२२ पासून आठवड्याचे चार दिवस वाढवण्यात आली आहे.

वरील नियमित गाड्यांव्यतिरिक्त, विविध सण आणि सुट्टीच्या प्रसंगी वेळोवेळी मुंबईहून कोकण प्रदेशात मुंबई आणि रत्नागिरी दरम्यान विशेष गाड्या चालवल्या जात आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ताडकळस (जि.परभणी) येथील जमिनीचा मावेजा शेतजमिन मालकास देण्याबाबत**

**(४) ५८१ (२६-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडकळस (जि.परभणी) येथील गट क्र.३२० मधील जमिन सन १९९६ मध्ये महावितरणच्या ३३ के.व्ही. उपकेंद्रासाठी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीचा मावेजा मागील ३० वर्षापासून संबंधित शेतजमिन मालकास मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित शेतकऱ्याला त्याच्या जमिनीचा मोबदला देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही,

ताडकसळस गावातील गट क्र. ३२० मधील ६४ आर जागा तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास उपकेंद्र उभारणीकरिता भूसंपादन कायदा १८९४ नुसार विशेष भूसंपादन अधिकारी, म. कृ. वि. परभणी यांचेमार्फत संपादित करण्यात आलेली आहे. सदर जागेचा आगाऊ ताबा दिनांक ०१.१२.१९९५ रोजी तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास देण्यात आलेला होता. संपादित केलेल्या जमिनीचा ८०% मोबदला रक्कम रु.३२,९२८/- हा धनादेश क्र. ९४७८२६ दिनांक २७.०५.१९९९ द्वारे विशेष भूसंपादन अधिकारी, म. कृ. वि. परभणी यांचेकडे भरणा करण्यात आलेला होता.

तद्नंतर भूसंपादन कायदा १८९४ नुसार विशेष भूसंपादन अधिकारी, म. कृ. वि. परभणी यांनी भूसंपादन प्रकरणात अंतिम निवाडा आदेश दिनांक १२.०७.२००५ रोजी पारित केला होता. अंतिम निवाड्यानुसार उर्वरीत मोबदला रक्कम रु.७८,७१८/- धनादेश क्र. १९७२३५ दिनांक २१.०९.२००५ द्वारे विशेष भूसंपादन अधिकारी, म. कृ. वि. परभणी यांचेकडे भरणा करण्यात आलेला होता. अशा प्रकारे जमिनीचा एकूण मोबदला रु.१,११,६४६/- इतकी रक्कम विशेष भूसंपादन अधिकारी, म. कृ. वि. परभणी यांचेकडे तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामार्फत जमा करण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यासह राज्यात प्रधानमंत्री मोफत सुर्यघर योजना प्रभावीप्रणे राबविण्याबाबत**

**(५) ६१३ (२६-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील १९ हजार ३२२ घरांचे सर्वेक्षण करण्यात आले असून त्यापैकी प्रधानमंत्री मोफत सुर्यघर योजनेंतर्गत केवळ ४ हजार ७९४ जणांनी प्रस्ताव दाखल केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) सदर योजनेसाठी परभणी जिल्ह्यासाठी शासनामार्फत आतापर्यंत किती अनुदान प्राप्त झाले आहेत,
(३) असल्यास, सदर योजना परभणी जिल्ह्यासह राज्यात प्रभावीपणे राबविण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे,

प्रधानमंत्री मोफत सुर्यघर योजनेंतर्गत परभणी जिल्ह्यात एकुण ८१३५ अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी ८०८३ ग्राहकांना तांत्रिक मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी, ६३४५ ग्राहकांनी विक्रेता (Vender) निवडलेली असून, ४३२८ ग्राहकांचे प्रधानमंत्री मोफत सुर्यधर योजनेत काम पूर्ण झाले आहे.
(२) प्रधानमंत्री मोफत सुर्यघर योजनेंतर्गत परभणी जिल्ह्यात एकुण ३९२४ ग्राहकांना रु.३०.५६ कोटी चे अनुदान मंजुर करण्यात आले असुन, त्यापैकी ३७२१ ग्राहकांना रु.२८.९७ कोटी चे अनुदान त्यांच्या बँक खात्यावर अदा करण्यात आले आहे.
(३) परभणी मंडळाअंतर्गत वीज ग्राहकांना प्रधानमंत्री मोफत सुर्यघर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी, प्रधानमंत्री मोफत सुर्यघर योजनेला प्रसिद्धी देण्याकरिता ऑगस्ट-२०२४ मध्ये पॅम्पलेटद्वारे सर्व उपविभागीय कार्यालयामार्फत स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायत सदस्य व महावितरण तर्फे ग्रामपंचायत स्तरावर बैठका आयोजित करून सदर योजनेची माहिती जनमाणसापर्यंत प्रसिध्द करण्यात आली. तसेच, दिनांक ११.०२.२०२५ ते १७.०२.२०२५ परभणी जिल्हा अंतर्गत बाह्यस्रोत कर्मचारी यांना परभणी लघु प्रशिक्षण केंद्र येथे प्रधानमंत्री मोफत सुर्यघर योजनेबाबतचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

तसेच, दिनांक १४.०२.२०२५ ते दिनांक १८.०२.२०२५ दरम्यान परभणी जिल्ह्यात कृषी संजीवनी महोत्सवात महावितरणमार्फत प्रधानमंत्री मोफत सूर्यघर योजना व इतर योजनेस प्रसिध्दी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील महाज्योतीने इतर मागासवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील युवकांना वैमानिकाचे प्रशिक्षण देण्यासाठी सुरु केलेल्या योजनेबाबत**

**(६) ६८० (०८-०४-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेने (महाज्योती) राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील युवकांना वैमानिकाचे प्रशिक्षण देण्याची योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाज्योती व नागपूर येथील फ्लाईंग क्लब यांच्यात दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१ रोजी करार केला असून याकरिता ७ कोटींपेक्षा अधिक रक्कम देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त करारानुसार विद्यार्थ्यांना माहे नोव्हेंबर, २०२२ पासून ११ महिन्यांचे २०० तासांचे उड्डाण प्रशिक्षण देणे अपेक्षित असतांना मात्र सन २०२४ पर्यंतच्या कालावधीत विद्यार्थ्यांना फक्त ५ टक्केच प्रशिक्षण मिळाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यामुळे महाज्योती, राज्य सरकार आणि नागपूर फ्लाईंग क्लबच्या चुकीच्या धोरणामुळे प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वैमानिक प्रशिक्षणापासून वंचित राहावे लागले आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर फ्लाईंग क्लबविरुद्ध कारवाई करुन विद्यार्थ्यांना वैमानिक प्रशिक्षण वेळेवर मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१३-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षणासाठी आवश्यक तो तांत्रिक अधिकारी/कर्मचारी नेमण्यासाठी तसेच प्रवेश क्षमता तयार करण्यासाठी नागपूर उड्डाण क्लब यांना महाज्योती संस्थेने प्रशिक्षणापूर्वी दिनांक ०३/०३/२०२१ रोजी रु. २.५० कोटी इतका निधी तसेच प्रशिक्षण सुरू करण्याकरिता दिनांक ३०/०९/२०२२ रोजी रु. ५.०० कोटी इतका निधी देण्यात आलेला आहे.

(३), (४), (५) महाज्योती नागपूर मार्फत व्यवसायिक वैमानिक पालयट प्रशिक्षणाकरिता दिनांक १३.०१.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये प्रशिक्षण कालावधी अंदाजीत १८ महिने नमूद होता. तथापि, नागपूर उड्डाण क्लब यांच्याकडून प्रशिक्षण विहीत वेळेत पूर्ण न झाल्याने त्यांच्याकडून दिनांक १२.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला होता. त्यास अनुसरून प्रशिक्षणार्थ्यांची DGCA परीक्षा उत्तीर्ण करण्याची क्षमता, प्रशिक्षणार्थ्यांचे उड्डाण कौशल्ये, तांत्रिक मनुष्यबळ उपलब्धता तसेच नागपूर विमान तळावरील कर्मशियल ट्राफिक, एअर फोर्स ट्राफिक, व्हीआयपी मुमेंट, हवामान परिस्थितीमुळे अनेकदा उड्डाणास परवानगी नाकारण्यात येणे, (ऑक्टोंबर/नोव्हेंबर २०२४ मधील एक महिन्याचा कालावधी वगळता) धावपट्टीचे देखरेखीकरणाचे काम सुरू असल्याने धावपट्टी सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० या कालावधीत उपलब्ध होऊ न शकणे इत्यादी नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण होण्यास विलंब झाला असल्याचे नागपूर फ्लाईंग क्लब यांनी कळविले आहे.तदनंतर देखील नागपूर फ्लाईंग क्लब यांनी विहीत कालावधीमध्ये प्रशिक्षण पूर्ण न केल्याने त्यांना दिनांक ०४.१२.२०२४ रोजी कारणे दाखवा नोटीस तसेच दिनांक २४.१२.२०२४ व दिनांक ०६.०५.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे सांमजस्य कारानुसार महाज्योती संस्थेमार्फत प्रशिक्षणाकरिता देण्यात आलेला निधी परत करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत वैमानिक प्रशिक्षणांकरिता पर्यायी व्यवस्था म्हणून पायोनिअर उड्डाण कल्ब, अलिगड, उत्तर प्रदेश यांच्याशी महाज्योती संस्थेने दिनांक ०३.०५.२०२५ रोजी सांमजस्य करार केला आहे. त्यानुसार सदर प्रशिक्षण संस्थेत एकूण १५ विद्यार्थी रुजू झाले असून त्यांचे प्रशिक्षण पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील ब्राहमणगाव परिसरात थ्री फेज सप्लाय वांरवार खंडित होत असल्याबाबत

**(७) ७१८ (२६-०४-२०२५). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील ब्राम्हणगाव परिसरात उन्हाळी कांदा लागवड चालू असतांना विजेच्या कमतरतेमुळे शेतीपंपासाठी दिला जाणारा थ्री फेज सप्लाय वांरवार खंडित होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात थ्री फेज सप्लाय वांरवार खंडित होत असल्याने उन्हाळी कांदा रोपांना पाणी देण्यासाठी अडचण निर्माण होत असून, शेती पिकांना पाणी देण्यासाठी वीजपुरवठयाची वेळ अयोग्य असल्याने तसेच सदर परिसरात बिबट्यांचा वावर असल्याने जीव मुठीत घेऊन पिकांना पाणी द्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे थ्री फेज सप्लायचे वेळापत्रक बदलून रात्रीच्या वेळा पहाटेपर्यत न ठेवता पहाटेपासून सकाळी दहापर्यत देण्यात येण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

ब्राम्हणगाव परिसरात माहे जानेवारी, २०२५ मध्ये वीजपुरवठा खंडित झाल्याची लेखी तक्रार महावितरण कंपनीकडे आढळून आली नाही. तथापि, स्थानिक पातळीवर अचानक काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास विद्युत पुरवठा खंडित होतो.

(२), (३) व (४), मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकाना दिवसा ८ तास किंवा रात्री ८ तास थ्री फेज वीजपुरवठा करण्यात येतो.

शेतकऱ्यांना दिवसा विद्युत पुरवठा देण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना (MSKVY २.०) अंतर्गत ३३/११ केव्ही वासुळ उपकेंद्र येथे ५ मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच, ३३/११ केव्ही लखमापूर येथे ५ मेगावॅट व ३३/११ केव्ही अजमेर सौंदाणे उपकेंद्र येथे १० मेगावॅटचे सौर ऊर्जा प्रकल्पाचे कामे प्रगतीपथावर आहेत. मौजे-ब्राम्हणगाव परिसरासाठी ३३/११ केव्ही वासुळ, लखमापूर व अजमेर सौंदाणे उपकेंद्रातून वीजपुरवठा केला जातो. ब्राम्हणगाव परिसरातील वीजग्राहकांना अधिक दर्जेदार वीजपुरवठा करण्यासाठी ACF योजनेअंतर्गत नवीन ३३/११ केव्ही ब्राम्हणगाव उपकेंद्राचे काम सुरु आहे. सदर ३३/११ केव्ही ५ एमव्हीए क्षमतेचे नवीन उपकेंद्र उभारण्यात येत असल्याने ११ केव्ही विद्युत वाहिन्यांची लांबी कमी होईल, तसेच ११ केव्ही ब्राम्हणगाव AG फिडर, ११ केव्ही ब्राम्हणगाव सिंगल फेज (AG) फिडर, ११ केव्ही पहाडेश्वर AG फिडर, व २२० केव्ही सटाणा उपकेंद्रातून निर्गमित होणाऱ्या ११ केव्ही अराई गावठाण आणि ११ केव्ही शेमळी फिडर वरील अंदाजे एकत्रित एकूण ४.५० मेगावॅट विद्युत भार कमी होऊन ब्राम्हणगाव परिसरातील वीजग्राहकांना अधिक दर्जेदार विद्युत पुरवठा होणेस मदत होईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदगांव (जि.नाशिका) तालुक्यात शेतात इलेक्ट्रीक मोटारचा शॉक लागून मुलाचा झालेला मृत्यू

**(८) ७१९ (२६-०४-२०२५). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यात शेतातील विहिरीवरुन पाण्याची इलेक्ट्रीक मोटार सुरु करण्यासाठी गेलेल्या पंधरा वर्षीय मुलगा देवा बाबासाहेब वाघ याला विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना माहे जानेवारी, २०२५ मध्ये घडली असल्याचे निदर्शनास आले आह, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्याअनुषंगाने मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर विद्युत अपघात प्रकरणात विद्युत निरीक्षक, नाशिक यांनी चौकशी करुन त्यांनी चौकशी अहवाल दिनांक १३.११.२०२५ नुसार सादर केलेला आहे. त्यामध्ये सदर अपघातास वीज संचमाडणी धारक जबाबदार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सबब, सदर अपघातास वीज संचमांडणी धारक जबाबदार असल्याने महावितरण कंपनीमार्फत मृत पावलेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे व सिंहगड कोळीवाडा (घेरासिंहगड) भागातील महावितरणाच्या वाहिनीचे काम पूर्ण करण्याबाबत

**(९) ८०९ (२६-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे व सिंहगड कोळीवाडा (घेरासिंहगड) भागात महावितरणाच्या वाहिनीचे काम वेळेत पूर्ण होत नसून व त्यास वन विभागाची परवानगी मिळण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी महावितरणाच्या पोल्स व अन्य साहित्य तेथे उपलब्ध असतांना देखील त्या भागातील नागरिकांना सौर ऊर्जेवर अवलंबून राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने वनविभाग तसेच महावितरण यांच्यातील समन्वय साधून महावितरणच्या वाहिनीने काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे,

पुणे जिल्हयातील सिंहगड कोळीवाडा (घेरासिंहगड) भागात महावितरणच्या नवीन वीज वाहिनीचे काम वन विभागाची परवानगी मिळण्यास विलंब होत असल्यामुळे प्रलंबित आहे. परंतु, सद्यस्थितीत पुणे व सिंहगड कोळीवाडा (घेरासिंहगड) भागात वनविभागाच्या जागेमध्ये वीज वाहिनीचे पोल उभे करण्याकरीता महावितरण व वनविभाग कार्यालय यांची माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये संयुक्त सर्व्हेक्षण बैठक होऊन वनविभाग कार्यालय यांच्या नियमानुसार व देखरेखेखाली सदर कामाची सुरुवात करण्यात आलेली आहे.
(२) व (३) सदर भागातील नागरिकांना पारंपारिक पध्दतीने वीज पुरवठा करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रु. १९.४५ लाख इतक्या रक्कमेची कामे मंजूर असून, त्यामध्ये ६३ केव्हीए क्षमतेचे १ नवीन रोहित्र व ३.५ कि.मी. नवीन लघुदाब वाहिनी इत्यादी कामांचा समावेश आहे. त्यासाठी फेब्रुवारी, २०२१ मध्ये जिल्हा नियोजन समिती, पुणे यांचेकडून निधी मंजूर झाला आहे. तसेच या कामासाठी महावितरणकडून ठेकेदारांची नियुक्ती करण्यात आलेली

होती व वाहिनी उभारणीसाठी लागणारे साहित्य त्या जागेवर नेऊन काम सुरु केले होते. परंतु नवीन वीज वाहिनीचा भाग वन विभागाच्या हद्दीतून जात आहे आणि वनविभागाच्या हरकती मुळे वीज वाहिनीचे काम अपूर्ण अवस्थेत होते.

महावितरण व वनविभाग यांचे संयुक्त सर्वेक्षण होऊन कामाची सुरुवात करण्यात आली असून, सडकेचे मेठ (०७ घरे) विद्युतीकरणासाठी, पार्किंग रोहित्रापासून ०१ कि.मी. एरियल बंच केबलचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर वाहिनी दिनांक २१.०४.२०२५ रोजी कार्यान्वित करण्यात आली असून,येथील घरांना वीज जोडणी देण्यात आली आहे. तसेच, अमुतेश्वर मेठ येथील (१२ घरे) विद्युतीकरणासाठी, २० पोलचे लघुदाब वाहिनीच्या व कळकीचे मेठ येथील (०५ घरे) विद्युतीकरणासाठी, १८ पोलचे लघुदाब वाहिनीच्या कामांची सुरुवात करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरात अखंडीत वीज पुरवठा करण्यासाठी अती-उच्चदाब टॉवर लाईन उपकेंद्र उभारण्याबाबत

**(१०) ९२५ (२६-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील धनकवडी, कात्रज, आंबेगाव, बावधन, धायरी, नऱ्हे व खडकवासला परिसरातील सतत खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरिक, व्यापारी, उद्योजक आणि वैद्यकीय संस्था यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात होणारे नागरीकरण आणि वीज ग्राहकांच्या वाढत्या संख्येमुळे वीज पुरवठ्याची कमतरता भासत असल्याने या समस्येवर उपाय म्हणून अती-उच्चदाब टॉवर लाईन उपकेंद्र उभारण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, कात्रज परिसरातील वन विभागाच्या उपलब्ध जागांवर अती-उच्चदाब उपकेंद्र उभारण्यासाठी महावितरणाने जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव दिला असून, उपविभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील वीज ग्राहकसंख्या धोरणानुसार मर्यादित ठेवण्यासाठी आणि वाढत्या ग्राहकसंख्येच्या मागणी पूर्ण करण्यासाठी कात्रजसाठी स्वतंत्र उपविभागीय कार्यालय स्थापन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या भागात महावितरणामार्फत प्रतीवर्षी सव्वा चारशे कोटी उत्पन्न मिळत असूनही शहरात अखंडीत वीज पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी ५० मेगा व्होल्ट ॲम्पीअर क्षमतेचे अती-उच्चदाब टॉवर लाईन उपकेंद्र उभारण्यासाठी महापारेषण आणि महावितरणाने नियोजन केले आहे काय, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अती-उच्चदाब टॉवर लाईन उपकेंद्र उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

पुणे शहरातील धनकवडी, कात्रज, आंबेगाव, बावधन, धायरी, नऱ्हे व खडकवासला परिसरात महावितरण कंपनीमार्फत सर्व वीज ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा करण्यात येतो. तथापि, काही प्रसंगी वीज वितरण प्रणालीतील तांत्रिक बिघाडामुळे वीज पुरवठा खंडित झाल्यास त्या परिसरातील संबंधित महावितरणचे अधिकारी व कर्मचारी तसेच सूचिबध्द ठेकेदारामार्फत विद्युत पुरवठ्यातील बिघाड दुरुस्त करुन त्वरीत वीज पुरवठा पूर्ववत करण्यात येतो.

(२) व (३) हे खरे आहे.

सद्यस्थितीत कात्रज, आंबेगाव या भागासाठी स्वतंत्र शाखा कार्यालये दिनांक ०१.०८.२०२५ रोजीच्या आदेशान्वये मंजूर करण्यात आले असून, सदरची शाखा कार्यालये कार्यान्वित झाली आहेत.

तसेच, पद्मावती विभागाअंतर्गत धनकवडी उपविभागीय कार्यालयाची दिनांक २२.०९.२०२५ नुसार पुनर्रचना करण्यात आलेली आहे. जेणेकरुन येथील वीज ग्राहकांना तत्पर सेवा देणे सुलभ होईल.

(४) व (५) महावितरण कंपनीमार्फत पद्मावती विभागाअंतर्गत नवीन अतिउच्चदाब उपकेंद्र मौजे मांगडेवाडी येथे उभारण्यासाठी लागणा-या जागेसाठी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच अंबाईदरा येथे उपकेंद्र उभारण्यासाठी पर्यायी जागा मिळणेकरीता जिल्हाधिकारी कार्यालय व महानगरपालिका यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## महानिर्मीती कंपनी अंतर्गत प्रकल्पग्रस्त म्हणून अभियांत्रीकी पदवी व पदविकाधारकांवर अन्याय झाल्याबाबत

**(११) १०४९ (२६-०४-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानिर्मीती कंपनी अंतर्गत प्रकल्पग्रस्त म्हणून अभियांत्रीकी पदवी व पदविकाधारक यांना रुजू होताना महानिर्मीती परिपत्रक सन २०१७ व परिपत्रक क्र ४३० दिनांक ३०.१.२०१९ नुसार दरवर्षी किमान ०५ व कमाल २५ गुण मिळेल असे नमूद केलेले आहे व त्याच धर्तीवर जाहीरात क्रमांक ४/१९ मध्ये तंत्रज्ञ ३ पदावर अभियांत्रीकी पदवी व पदविकाधारक रूजु झाले आहे, परंतु महानिर्मीतीचे शुध्दीपत्रक दिनांक ७.१.२०२५ नुसार उक्त कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार असल्यामुळे सदर परिपत्रक रद्द करण्याची विनंती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी वि.स.स. बल्लारपूर यांनी मा.मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांना दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी व त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०२६) :** (१) महानिर्मिती कंपनीच्या पात्र प्रकल्पग्रस्तांपैकी अभियांत्रिकी पदवी/पदविकाधारक उमेदवारांना प्रकप्लग्रस्तांना प्रगत कुशल प्रशिक्षणाच्या प्रत्येक प्रशिक्षणाच्या प्रत्येक वर्षासाठी किमान ५ गुण असे कमाल २५ गुण देण्याबाबत तरतूद होती त्याअनुषंगाने उमेदवारांना तंत्रज्ञ ३ पदाच्या जाहिरात क्र.०४/२०१९ मध्ये प्रशिक्षणाच्या प्रत्येक वर्षासाठी किमान ५ गुण असे कमाल २५ गुण देण्यात आली.

परंतु महानिर्मिती कंपनीने प्रशासकिय परिपत्रक क्र.५०८ दिनांक १६.११.२०२२ अन्वये सदर उमेदवारांना सहाय्यक अभियंता व कनिष्ठ अभियंता या पदाच्या सरळसेवा भरतीमध्ये अतिरिक्त गुण देण्याबाबत तरतूद केली आहे. त्यामुळे अभियांत्रिकी पदवी/पदविकाधारक उमेदवारांना तंत्रज्ञ-३ पदाच्या जाहिरात क्र.०४/२०२४ अन्वये सरळसेवा भरतीमध्ये अतिरिक्त गुण देण्याबाबत तरतूद नमूद करण्यात आली नाही.

(२) मा.वि.स.स.बल्लारपूर यांनी मा. मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांना दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी व त्यासुमारास सादर केलेले लेखी निवेदन महानिर्मिती कंपनी कार्यालयास अद्यापी प्राप्त झालेले नाही. तथापि, अन्य लोकप्रतिनिधी यांचे या संदर्भातील निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) याविषयी मा. लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या विनंतीप्रमाणे महानिर्मिती कंपनीच्या पात्र प्रकल्पग्रस्तापैकी अभियांत्रिकी पदवी/पदविकाधारक उमेदवारांना तंत्रज्ञ-३ पदाच्या जाहिरात क्र.०४/२०२४ मध्ये प्रशिक्षणाच्या प्रत्येक वर्षासाठी किमान ०५ गुण असे कमान २५ गुण देण्याबाबत महानिर्मिती कंपनीने परिपत्रक क्र.८१२ दिनांक २९.०१ २०२५ अन्वये सुधारणा केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खडकवासला (जि.पुणे) क्षेत्रातील प्रमुख रस्त्यांवरील अडथळे दूर करण्यासह रस्ता वाहतूक सुरु करण्याबाबत**

**(१२) १०६४ (२६-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला (जि.पुणे) क्षेत्रातील प्रमुख रस्त्यांवरील अडथळा ठरणारे वरील आणि भूमीगत उपयोगिता लाईन्स (Overhead and Underground Utility Lines) हटविण्यात दिरंगाई होत असल्यामुळे वाहतूक कोंडी होत असून, अनेक रस्ते वापराविना पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उपरोक्त क्षेत्रातील रस्त्यावरील अडथळे दूर करण्यासह रस्ता वाहतूक सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०२६) :** (१) व (२) महावितरण कंपनीच्या मुळशी व पर्वती विभागाअंतर्गत खडकवासला परिसर येतो. रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाच्या वेळी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका/ नगरपालिका) किंवा सार्वजनिक बांधकाम हे महावितरण कंपनीस वीज वितरण प्रणाली स्थलांतरीत करण्याबाबत कळवितात. त्यानुसार, महावितरण कंपनी व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था त्याकामाची संयुक्त पहाणी करुन वीज वितरण प्रणाली स्थलांतराचे अंदाजपत्रक बनविण्यात येते. सदर अंदाजपत्रक महावितरणकडे १.३% देखभाल खर्च भरुन DDF या योजनेअंतर्गत मंजूर करुन संबंधित संस्था / विभागामार्फत ते काम करण्यात येते किंवा त्या कामाचे १००% DDF योजनेअंतर्गत मंजूर करुन महावितरणकडे सर्व खर्च भरुन महावितरण कंपनीतर्फे काम करण्यात येते.

त्यानुसार, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शिफारस केलेली विद्युत प्रणाली स्थलांतरित करणेबाबतची कामे, महानगरपालिका त्यांच्या अखत्यारितील कामे करतात. खडकवासला (जि.पुणे) क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थाकडून काही ठिकाणी रस्त्याचे रुंदीकरण केले आहे. परंतू, त्या कामामध्ये महावितरण कंपनीमार्फत लाईन्स हटविण्यात कोणतीही दिरंगाई झालेली नाही.
(३) खडकवासला (जि.पुणे) क्षेत्रातील वीज वितरण प्रणाली स्थलांतरीत करण्याच्या ओव्हर हेड आणि अंडर ग्राऊंड युटीलिटी लाईन्स हटविण्याच्या ९ कामांपैकी १ काम पूर्ण झाले आहे. तसेच १ काम पुणे महानगरपालिका रस्ता खोदाई परवानगीसाठी प्रलंबित असून, २ कामांना महावितरणकडून १.३% डीडीएफ अंतर्गत मंजुरी देण्यात आली आहे. उर्वरीत ५ कामांना निधी प्राप्त झालेला नाही. सदरच्या कामांमध्ये महावितरण कंपनीमुळे कोणतीही दिरंगाई झालेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मिरज (जि.सांगली) येथे दररोज विनापरवाना २५०-३०० कर्नाटक बसेस येत असल्याबाबत**

**(१३) ११३५ (०८-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (जि.सांगली) येथे दररोज विनापरवाना २५०-३०० कर्नाटकच्या बसेस येत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बसेसची शासनाने तपासणी सुरु केली आहे काय, त्यात किती बसेस विनापरवाना आढळून आल्या आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन नियमांचे पालन न करता विनापरवाना येणाऱ्या कर्नाटक बसेसवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०८-०४-२०२६) :** (१), (२), (३) व (४) मिरज (जि.सांगली) येथील बसस्थानकावर कर्नाटक राज्यांच्या बसेसची तपासणी केली असता कर्नाटक राज्यांच्या २०१ बसेस येत असल्याचे आढळून आले आहे. सदर प्रवासी वाहतूक कर्नाटक राज्यासोबत झालेल्या अन्योन्य वाहतूक करारान्वये सुरु आहे. मिरज बसस्थानकावर येणाऱ्या सदर बसेसची तपासणी केली असता कर्नाटक राज्य परिवहन महामंडळाची एकही बस विनापरवाना आढळून आलेली नाही. तसेच याबाबत वेळोवेळी दक्षता घेण्यात येत आहे.

---

**महाज्योतीने विशिष्ट संस्थांना लाभ मिळावा म्हणून समान धोरणातून टक्केवारीच्या कारणास्तव बाहेर पडल्याबाबत**

**(१४) १२५० (०८-०४-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पुणे जिल्ह्यात महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (महाज्योती) माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या स्पर्धा परीक्षांच्या पूर्व प्रशिक्षणाचा कार्यक्रम घेत असताना महाज्योतीने विशिष्ट संस्थांना लाभ मिळावा म्हणून समान धोरणातून टक्केवारीच्या कारणास्तव बाहेर पडल्याने विविध विद्यार्थी संघटनांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये चौकशीची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक विद्यार्थी संघटना आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांच्या विरोधात मुख्यमंत्र्यांच्या नावाने लिहिलेले पत्र महाज्योतीने स्वीकारले असून त्यावर आवक क्रमांक टाकण्यात आल्याने मुख्यमंत्र्यांच्या नावे असलेली पत्रे महाज्योतीला स्वीकारण्याचा अधिकार कोणी दिला, असा प्रश्न उपस्थित केला जाऊ लागला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१३-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

समान धोरणांतर्गत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (TRTI), पुणे यांचेमार्फत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रशिक्षण संस्थांची निवड करण्याकरिता प्रसिध्द करण्यात आलेल्या ई-निविदामध्ये त्रुटी असल्याबाबत विविध माध्यमातून तक्रारी झाल्याने ज्या संस्थेकडील विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण संस्थेची नेमणूक

करावायची त्याच संस्थेमार्फत ई-निविदा राबविणे आवश्यक असल्याने महाज्योती संस्थेकडील स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता प्रशिक्षण संस्थांची निवड करण्याकरीता निविदा प्रक्रिया महाज्योतीमार्फत राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. समान धोरणानुसार इतर सर्व निकषांची अंमलबजावणी महाज्योती या संस्थेमार्फत करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.

सदर तक्रार मा. मुख्यमंत्री महोदय यांना उद्देशून केली असून त्याची प्रत माहितीसाठी महाज्योती, नागपूर कार्यालयास देखील सादर करण्यात आलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील भांडुप (प.) येथील हनुमान नगर परिसरातील विद्युत ट्रॉन्सफार्मरमध्ये वारंवार बिघाड होऊन लागत असलेल्या आगीबाबत

**(१५) १८६८ (२६-०४-२०२५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील भांडुप (प.) येथील हनुमान नगर परिसरात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने बसविलेल्या विद्युत ट्रॉन्सफार्मरमध्ये होत असलेल्या सततच्या बिघाडामुळे तसेच वारंवार लागत असलेल्या आगीमुळे येथील परिसरातील नागरिक त्रस्त झाले असून त्यांच्या जिवितास धोका देखील निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी महावितरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांना अनेक निवेदने देऊन ट्रॉन्सफॉर्मर बदली करण्याच्या मागणीकडे महावितरण कार्यालयातील अधिकारी जाणूनबुजून दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

महावितरण कंपनीच्या भांडुप परिमंडळाअंर्तगत ठाणे शहर मंडळाच्या कार्यक्षेत्रात भांडुप विभाग व ईश्वरनगर- भांडुप उपविभागाअंतर्गत हनुमाननगर परिसरात महावितरणची ६३० केव्हीए क्षमतेची दोन रोहीत्रे आहेत. सदर रोहीत्रांच्या जवळ नागरीकांनी कचरा टाकल्यामुळे त्या कचऱ्यास आग लागण्याच्या काही घटना निदर्शनास आल्या होत्या.
(२) हे खरे नाही.

भविष्यातील अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक कार्यवाही म्हणून रोहीत्रास प्लिथवर बसविणे, संलग्न रिंग मेन युनिट व फिडर पिलर यांची उंची वाढविणे आणि जिर्ण फिडर पिलर बदलण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. रोहीत्राजवळ कचरा टाकणे थांबविण्यासाठी रोहीत्रांभोवती फेन्सिगचे काम पूर्ण करण्यात आले आहे. या प्रतिबंधात्मक उपाययोजनांमुळे जुलै, २०२५ पासून आग लागण्याची एकही घटना घडलेली नाही. सध्या हनुमाननगर येथील रोहीत्रे सुस्थितीत असून, ती बदलण्याची आवश्यकता नाही, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये माहे ऑक्टोबर, २०२५ पर्यंत सदर २ रोहीत्रांपैकी कोणत्याही रोहीत्रामध्ये बिघाड झालेला नाही.
(३) भविष्यातील येणाऱ्या वाढीव भाराचा विचार करुन एक नवीन अतिरिक्त ६३० केव्हिए क्षमतेचे रोहीत्र दिनांक १५.०९.२०२५ द्वारे जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजुर करण्यात आलेले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सदर कामासाठी प्रशासकीय मान्यता व निधी प्राप्त झाल्यानंतर सदर काम त्वरीत पूर्ण करण्यात येणार आहे. नादुरुस्त

रोहीत्रे तातडीने बदलण्यासाठी महावितरणमार्फत विभागनिहाय सुचिबद्ध कंत्राटदार नियुक्त करण्यात आलेले आहेत. तसेच ठाणे मंडळाअंतर्गत वितरण रोहीत्र नादुरुस्त झाल्यास ते बदलण्यासाठी विभागीय भांडारात दुरुस्त केलेल्या २२ वितरण रोहीत्रांचा साठा उपलब्ध आहे. तसेच, नादुरुस्त वितरण रोहीत्रे वेळेत बदलण्यासाठी एकूण १३१ वितरण रोहीत्रे चक्राकार पद्धतीने उपलब्ध आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**फलटण (जि.सातारा) शहराला नविन उपकेंद्र व अंडरग्राऊंड केबल टाकण्याबाबतच्या प्रस्तावास मंजूरी मिळून निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(१६) २१०६ (२५-०४-२०२५). श्री.सचिन पाटील (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फलटण (जि.सातारा) शहराला विद्युत पुरवठा हा १३२/३३/२२ KV कोळकी या EHV महापारेषण उपकेंद्राद्वारे करण्यात येत असून महावितरण कंपनीचे कोणतेही स्वतंत्र उपकेंद्र फलटण शहरासाठी आजपर्यंत निर्माण करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे फलटण शहरामध्ये वांरवार विद्युत पुरवठा खंडीत झाल्यावर व कोणत्याही ठिकाणी बिघाड झाल्यास पूर्ण शहरामधील म्हणजेच जिंतीनाका (उत्तर बाजूस) या ठिकाणी बिघाड झाला तर विमानतळ (पश्चिम बाजू) दक्षिण व पूर्व बाजूचा सुध्दा विद्युत पुरवठा खंडीत होत असणे, जाधववाडी पासून ते पुढे जिंतीनाका पासून ते लोणंद रोड पर्यंतचा संपूर्ण भाग या २२ KV फलटण फिडर वर पूर्णत: अवलंबून असणे तसेच शहराचा पूर्व भाग हा २२ KV YC फिडरवर अवलंबून असल्याने विद्युत पुरवठयावर परिणाम होऊन विद्युत पुरवठा बंद होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, फलटण शहरामध्ये विद्युत जाळे HT/LT LINES खूप मोठया प्रमाणात असून वारंवार अपघात होत असल्यामुळे, संपूर्ण शहरांतर्गत अंडरग्राऊंड विद्युत वाहिनी (केबल) टाकल्यास विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही व अपघाताचे प्रमाणही कमी होईल ही बाब विचारात घेता त्वरीत अंडरग्राऊंड विद्युत वाहिनीचे (केबल) काम कार्यान्वित होणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी महावितरण मुख्य कार्यालय, प्रकाशगड, मुंबई यांचेकडे बऱ्याच कालावधीपासून प्रलंबित असून फलटण शहरासाठी नविन उपकेंद्र व संपूर्ण फलटण शहरामध्ये अंडरग्राऊंड केबलचे काम तातडीने करण्याबाबतची मागणी शहरवासिय व ग्रामस्थांनी शासनाकडे बऱ्याच दिवसांपासून करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शहरवासिय व ग्रामस्थांची मागणी विचारात घेऊन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदरची मागणी मान्य करण्याबाबत व त्यासाठी आर्थिक तरतूद करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे मागणी केल्यावर अप्पर मुख्य सचिव (ऊर्जा) यांना सदर प्रकरणी कार्यवाही करण्याबाबत सुचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे,

तथापि, RDSS योजनेअंतर्गत फलटण शहरासाठी ३३/२२ के.व्ही. २x१० एम.व्ही.ए. क्षमतेचे उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आलेले आहे.
(२) हे खरे नाही.

फलटण शहराला वीज पुरवठा करणाऱ्या २२ के.व्ही. विद्युत वाहिनीत तांत्रिक बिघाड झाल्यामुळे

शहरातील विद्युत पुरवठा खंडित झाला होता. परंतू, उपलब्ध पर्यायी २२ के. व्ही. वाहिनीद्वारे विद्युत पुरवठा लगेच सुरळीत करण्यात आला. तसेच नादुरुस्त वाहिनी वरील तांत्रिक बिघाड दूर करून वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला.

(३) फलटण शहरातील HT/LT LINES ची देखभाल व दुरुस्तीची कामे हाती घेऊन सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक असलेली कामे यामध्ये उघड्या पेट्या बंद करने, रोड क्रॉसिंग वाहिनी खाली गार्डिंग वायर लावणे इत्यादी कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या व्यतिरिक्त अपघात प्रवण ठिकाणी असलेल्या लघुदाब वाहिनीच्या ८५ गाळयांमध्ये ए.बी. केबल बसविण्याचे कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे आहे.

(६) सदर मागणीच्या अनुषंगाने फलटण शहरासाठी ३३/२२ के. व्ही. २ x १० एम.व्ही.ए. क्षमतेचे उपकेंद्र तसेच फलटण शहरातील उपरी विद्युत वाहिन्या भूमिगत वाहिन्यामध्ये रुपांतरीत करण्यासाठीची कामे RDSS योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. सुधारीत वितरण क्षेत्र योजनेच्या (RDSS) मार्गदर्शक तत्त्वांनुसार सदरील कामे योजनेअंतर्गत असणाऱ्या “वितरण प्रणालीचे सक्षमीकरण व आधुनिकीकरण यामध्ये अंतर्भूत आहेत.

---

## पुणे पोलीस आयुक्तालयांतर्गत २०२४ या वर्षात बेवारस मृतदेहांमध्ये झालेली वाढ

**(१७) २१४८ (२७-०४-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे पोलीस आयुक्तालयांतर्गत २०२३ या वर्षाच्या तुलनेत माहे जानेवारी ते नोव्हेंबर २०२४ या वर्षात या ११ महिन्याच्या कालावधीत २३६ बेवारस मृतदेहाच्या प्रमाणात वाढ झाल्याची गंभीर बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर बेवारस मृतदेहांची ओळख न पटल्यामुळे किंवा नातेवाईक न भेटल्यामुळे मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यासही विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बेवारस मृतदेहांच्या प्रमाणात वाढ होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून हे प्रमाण कमी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यक्षेत्रामधील सन २०२३ या कालावधीत एकूण ४३५ बेवारस मयत नोंद करण्यात आलेली असून, माहे जानेवारी ते नोव्हेंबर, २०२४ या कालावधीमध्ये ४१९ बेवारस मृतदेहांची नोंद दाखल झालेली आहेत.

(२) हे खरे नाही.

मृतदेहांची ओळख न पटल्यामुळे अथवा नातेवाईक मिळून न आल्यास, मृतदेह ३ दिवस शवागृहात ठेवून नातेवाईकांचा शोध घेण्यात येतो. नातेवाईक मिळून न आल्यास बेवारस मृतदेहावर आरोग्य विभाग, पुणे महानगर पालिका यांचेमार्फत अंत्यसंस्कार करण्यात येतात.

(३) व (४) पुणे शहराच्या हद्दीमध्ये फिरस्ते, मानसिक रुग्ण, आजारी, व्यसनाधीन बेघर यांचे प्रमाण जास्त असल्यामुळे बेवारस मृतदेह आढळून येत आहेत. तसेच त्यांचेकडे ओळख पटविण्यासाठी कोणतीही कागदपत्रे /

पुरावा मिळून येत नाही. ज्येष्ठ नागरिक, बेवारस मनोरुग्ण इ. यांना आधार मिळवून देण्याबाबत तसेच त्यांच्याकरिता हेल्पलाईन सुरु करण्याबाबत शासनाकडून पोलीसांना निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच, पोलीस प्रशासनाकडून गस्तीचे प्रमाण वाढविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहेरी (जि.गडचिरोली) येथील पोलीस उप निरीक्षक व पोलीस अंमलदार यांच्यामुळे एका महिला शिक्षिकेला नाहक त्रास झाल्याबाबत

**(१८) २५३५ (२५-०४-२०२५). श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहेरी (जि.गडचिरोली) तालुक्यातील दामरचा जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक शाळेतील प्राथमिक शिक्षिका कु.पौर्णिमा तुळशीराम कुकुडकर (वय ५२ वर्षे) या दिनांक २५जानेवारी, २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनाची तयारी करीत असतांना पोलीस अंमलदार, श्री.ऋषिकेश इंगळे (बॅ.नं.२५११) यांनी पोलीस उपनिरीक्षक, श्री.गणेश शिंदे यांच्या नोटीशीच्या अनुषंगाने सोबत येण्याचे सांगितले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कु.कुकुडकर यांनी उक्त नोटीशीच्या अनुषंगाने माझा या विषयाची कोणताही संबंध नाही असे सांगितले असता, श्री.इंगळे, पोलीस अंमलदार यांनी त्यांना दमदाटी करुन बाईकवर बसवून नेत असतांना, चामोरशी (जि.गडचिरोली) येथे त्या बाईकचा अपघात झाला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अपघातामध्ये कु.कुकुडकर यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना गडचिरोली येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असता त्यांची प्रकृती अत्यंत खालावली असल्याने त्यांना नागपूर खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कु.पौर्णिका या महिला शिक्षक असतांना त्यांना घेऊन जावयास महिला पोलीस कर्मचारी नेमणे आवश्यक असतांना तसेच दामरचा ते गडचिरोली हे अंतर २०० कि.मी.व दुर्गमभाग असतांना पोलीस प्रशासनाने चार चाकी वाहनांची आणणे आवश्यक असतांना त्यांना बाईकवरुन घेऊन जाण्यामागची नेमकी कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुद्ध कार्यवाही करण्यासह अपघातग्रस्त महिला शिक्षिकेला आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

जिल्हा परिषद शाळा, वेलगूर येथील तत्कालीन शिक्षक संजय चांदेकर यांच्या निधनानंतर मिळणारे अनुदान वेळेत मिळाले नसल्याने त्यांच्या पत्नीने प्रजासत्ताक दिनी गट शिक्षणाधिकारी कार्यालय, गडचिरोली समोर आत्मदहन करण्याचा इशारा दिलेला होता. या प्रकरणी सदर महिलेस आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी प्रभारी अधिकारी, गणेश शिंदे यांनी सदर महिलेस ओळखणारी व्यक्ती म्हणून कु.पोर्णिमा कुकुडकर, जि.प.शिक्षिका, दामरचा यांना सोबत घेऊन जाण्याकरिता श्री.ऋषिकेश इंगळे, पोलीस अंमलदार यांना नोटीस दिली होती.
(२) नाही,

श्रीमती कुकुडकर यांनी स्वत: आत्मदहनकर्त्या श्रीमती कविता संजय चांदेकर यांना ओळखत असुन त्यांनी दिलेले आत्मदहनाचे इशाऱ्यापासून त्यांना परावृत्त करण्याची तयारी दर्शवली होती. पोलीस अंमलदार, इंगळे यांनी त्यांना कोणत्याही प्रकारची दमदाटी केलेली नाही. आलापल्ली, जि. गडचिरोली येथे आलापल्ली ते गडचिरोली जाणेकरिता सायंकाळी कोणत्याही सार्वजनिक वाहतुकीचे साधन नसल्याने त्या पोलीस अंमलदार, ऋषीकेश इंगळे यांचेसोबत गडचिरोली येथे मोटार सायकलवरून जात असतांना अपघात झालेला आहे.

(३) होय, हे खरे आहे.
(४) गडचिरोली जिल्ह्यात सर्वाधिक माओवादी कारवायांनी ग्रस्त असल्याने या संपूर्ण जिल्ह्यात चारचाकी वाहन वापरण्याकरीता प्रमाणित मानक प्रणाली निश्चित असून चारचाकी वाहन वापरल्यास नक्षलवाद्यांच्या भूसुरुंग स्फोटापासून अधिक धोका संभव असतो. या तुलनेत दुचाकीचा वापरात कमी धोका असतो. या कारणाने दुचाकीचा वापर करण्यात आला. उप. पो.स्टे.ला कोणतेही शासकीय वाहन व गावात कोणतेही खाजगी वाहन उपलब्ध नाही. तिथे कार्यरत कोणत्याही महिला अंमलदारांना दुचाकी चालविता येत नसल्याने महिला अंमलदार पाठविता आले नाही.
(५) प्रकरणी दिनांक २९.०१.२०२५ रोजी चामोर्शी पोलीस ठाणे येथे अज्ञात वाहन चालकाविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपी मिळून येताच त्यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई करुन, आर्थिक मदतीकरीता मोटार अपघात दावा प्राधिकरण, गडचिरोली येथे सविस्तर अहवाल दाखल करण्याची तजविज ठेवली आहे.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्याकरिता ग्रामीण -१ व ग्रामीण -२ नवीन उपविभागाला RDS योजनेच्या प्रस्तावाबाबत

**(१९) २५७८ (२९-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्याकरिता ग्रामीण -१ व ग्रामीण -२ नवीन उपविभागाला RDS योजनेत प्रस्ताव तयार करून मंजुरी देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.ऊर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक २८ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) महावितरण कंपनीमार्फत अंबाजोगाई ग्रामीण उपविभागाचे विभाजन करुन अंबाजोगाई उपविभाग क्र.२ निर्माण करण्याबाबतचा आदेश दिनांक २५.०९.२०२५ अन्वये निर्गमित करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिराळा, आटपाटी, खानावर व जत (जि.सांगली) येथे विद्युत पुरवठा अखंडित व योग्य दाबाने करण्याबाबत

**(२०) २७१५ (२५-०४-२०२५). श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिराळा, आटपाटी, खानापूर व जत (जि.सांगली) येथील कृषीपंपाच्या वीज मागणीमध्ये वाढ झाल्यामुळे वीज वितरणाच्या पायाभूत सुविधा कमी पडत असून वितरण रोहित्रे (TC) अतिभारीत होऊन नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढले असून वीज पुरवठ्यामध्ये वारंवार व्यत्यय येत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणच्या अनेक गावामध्ये विद्युत खांब मोडकळीस येणे, विद्युत खांब रस्त्यावर वाकणे, विद्युत वाहिन्या लोंबकळणे, विद्युत रोहित्र उघडे व नादुरुस्त असणे आदि मोठया प्रमाणात विद्युत समस्यांमुळे नागरीकांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मतदारसंघातील सर्व नागरीकांना अखंडित व योग्य दाबाने विद्युत पुरवठा करण्यासाठी १२०३ रोहित्रांकरिता (DTC) करिता रुपये ८४ कोटी निधीची आवश्यकता असून सदरहू निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार उक्त ठिकाणी मागणीच्या अनुषंगाने नवीन डीपी व त्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

शिराळा, आटपाटी, खानापूर व जत तालुक्यात सन २०२५-२६ मध्ये आजपर्यंत एकूण ८९२ रोहित्रे नादुरुस्त झाली होती. तथापि ही सर्व रोहित्रे तात्काळ बदलण्यात आली आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) सांगली मंडळाअंतर्गत निरंतर विज योजनेअंतर्गत एकूण ३४८ रोहित्रे बसविण्यात आली आहेत. तसेच, RDSS Loss Reduction योजनेमध्ये ४१८ रोहित्रांचे काम प्रस्तावित असून, त्यापैकी ३४० रोहित्रांचे काम पूर्ण झाले आहे.

तसेच, MSKVY २.० (RDSS) बळकटीकरण योजनेअंतर्गत सुमारे १३ नवीन उपकेंद्र, ७ अतिरिक्त पाँवर ट्रान्सफॉर्मर क्षमता वाढ, इत्यादी रु. १४६.२८ कोटीची कामे अंतर्भूत असून त्यापैकी ०१ नवीन उपकेंद्र ०५ अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर व ०८ पॉवर ट्रान्सफॉर्मर क्षमता वाढ इत्यादी कामे पूर्ण करण्यात आली आहेत. MSKVY २.० क्षमता वाढ योजनेअंतर्गत सुमारे १६ अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर, १५ पॉवर ट्रान्सफॉर्मर क्षमतावाढ इत्यादी रु.३५.१४ कोटीची कामे अंतर्भूत असून, त्यापैकी ०६ अतिरिक्त पाँवर ट्रान्सफॉर्मर व ०८ पॉवर ट्रान्सफॉर्मर क्षमतावाढ इत्यादी कामे पूर्ण करण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## श्रीरामपूर (ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर) येथील महावितरण कंपनीच्या उपविभागाचे विभाजन करण्याबाबत

**(२१) २७१९ (२८-०४-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीरामपूर (ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर) येथील महावितरण कंपनीच्या उपविभागीय कार्यालयाने उपविभागाचे विभाजन करण्याचा प्रस्ताव दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) महावितरण कंपनीच्या श्रीरामपूर ग्रामीण उपविभागाचे विभाजन करुन नव्याने बेलापूर ग्रामीण उपविभागीय कार्यालय महावितरण कंपनीच्या दिनांक २५.०९.२०२५ रोजीच्या आदेशान्वये मंजूर करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चाळीसगाव (जि.जळगांव) शहरांमध्ये भूमिगत केबलच्या सहाय्याने वीज पुरवठा करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२२) २८४९ (२७-०४-२०२५). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (जि.जळगांव) शहरांमध्ये भूमिगत केबलच्या सहाय्याने वीज पुरवठा करणेबाबत सन २०१८ मध्ये शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असून, सदर प्रस्तावामध्ये मुख्य कार्यालय, महावितरण यांनी पत्र क्र.८०६५ दिनांक १२/४/२०१८ रोजी प्रधान सचिव, ऊर्जा विभाग यांना निधी मंजुरीसाठी पत्र पाठविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच, चाळीसगाव नगरपरिषद हद्दीतील रेल्वे स्टेशन ते कृषी उत्पन्न बाजार समिती घाटरोड चाळीसगावपर्यंत वीज वाहिनी भूमिगत करणे व सदरच्या रस्त्यावर वीजेची व्यवस्था करणेबाबत शासनाकडे रीतसर प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

चाळीसगाव नगरपरीषद हद्दीतील रेल्वे स्टेशन ते कृषी उत्पन्न बाजार समिती घाट रोडपर्यंत वीजवाहिनी भुमीगत करण्याच्या अंदाजपत्रकास मुख्य अभियंता, जळगाव परीमंडळ यांचेकडून दिनांक ०५.०६.२०२५ रोजीच्या पत्रांन्वये रु.८,६०,११,९४४ इतक्या रकमेचे अंदाजपत्रक मंजुर असून त्यावर रु.९,६१,३१०.६० इतके सुपरव्हिजन शुल्क आकरण्यात आलेले आहे. मंजुरीच्या अनुषंगाने मुख्याधिकारी, चाळीसगाव नगरपालिका यांना सुपरव्हिजन शुल्क भरण्याचे कोटेशन दिनांक १७.०६.२०२५ रोजी देण्यात आलेले आहे. सदर काम चाळीसगाव नगरपालिकेने स्वखर्चाने १.३% समर्पित वितरण सुविधा (DDF) योजनेअंतर्गत वीजवाहिनीच्या भूमिगत करणाच्या तांत्रिक अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यात वाढत असलेली गुन्हेगारी रोखण्याबाबत**

**(२३) ३०८१ (२६-०४-२०२५). श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात मागील ११ महिन्यात तब्बल ७२ खून झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा घटनामुळे संपूर्ण यवतमाळ जिल्हयात भितीचे व चिंतेचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ जिल्हयात वाढत असलेली गुन्हेगारी त्वरीत रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

यवतमाळ जिल्ह्यात दिनांक १ फेब्रुवारी ते ३१ डिसेंबर, २०२४ या कालावधीमध्ये म्हणजेच मागील ११ महिन्यात एकूण ५७ खुनाचे गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. माहे जानेवारी, २०२५ मध्ये २ खुनाचे गुन्हे नोंद झाले आहेत.

(२) व (३) यवतमाळ जिल्ह्यामध्ये घडलेले गुन्हे बहुतांश अनैतिक संबंध, घरगुती वाद, दारुच्या नशेत व जुन्या भांडणावरुन घडलेले आहेत. सदर गुन्ह्यातील आरोपींवर कायदेशीर प्रभावी कारवाई करण्यात आलेली आहे.

वाढत असलेली गुन्हेगारी रोखण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात येते.

१. गंभीर गुन्हे दाखल होताच आरोपीस तात्काळ अटक करण्यात येते.

२. अटक आरोपी जेल रिलिज होताच तात्काळ प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे.

३. गंभीर गुन्ह्यातील सराईत गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए., तडीपार, म.को.का. अशा कायद्यान्वये प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते.

४.जिल्ह्यातील बेरोजगार युवक गुन्हेगारीकडे वळू नये याकरिता त्यांना परावृत्त करण्याकरिता "ऑपरेशन प्रस्थान" अंतर्गत नि:शुल्क व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## एमपीएससी विद्यार्थ्यांनी यूपीएससी विद्यार्थ्याप्रमाणे तीन प्रशिक्षण वर्गाचा पर्याय देण्याबाबत

**(२४) ३३०५ (२७-०४-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाज्योतीने "एमपीएससी" ने नुकताच "यूपीएससी" च्या धर्तीवर अभ्यासक्रमात बदल केला असुन युपीएससी प्रमाणेच एमपीएससी करिता देखील विद्यार्थ्याना किमान तीन प्रशिक्षण संस्थांचा पर्याय देणे अपेक्षित असताना महाज्योतीने काही महिन्यापूर्वीच पत्र काढून ज्ञानदीप अकादमी, पुणे या संस्थेला पूर्व प्रशिक्षणाची जबाबदारी दिली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, "एमपीएससी" च्या अभ्यासक्रमात मोठा बदल करण्यात आला असून २७ वैकल्पिक विषय असून प्रत्येक विद्यार्थी हा वेगळया वैकल्पिक विषयाची निवड करत असल्याने एकाच शिकवणीमध्ये या सर्व विषयांचे प्रशिक्षण मिळणे देखील कठीण आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विद्यार्थ्यांनी महाज्योतीने यूपीएससी विद्यार्थ्याप्रमाणे एमपीएससी करिता तीन प्रशिक्षण वर्गाचा पर्याय द्यावा अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१५-०४-२०२६) :** (१), (२), (३) महाज्योती संस्थेव्दारे एमपीएससीच्या सुधारित अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण देण्याकरिता ई- निविदा पद्धतीने ज्ञानदिप अकादमी, पुणे व द युनिक अकादमी, पुणे अशा दोन संस्थाची निवड करण्यात आलेली आहे. उक्त प्रशिक्षण संस्थाकडे विद्यार्थ्यांनी ज्या वैकल्पिक विषयांच्या प्रशिक्षणाची मागणी केलेली आहे, त्या वैकल्पिक विषयांचे प्रशिक्षक व सुविधा दोन्ही उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात झालेल्या बदलानुसार सुलभपणे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील सौंदे येथे १३२/३३ केव्ही उच्चदाब सबस्टेशन मंजुरीबाबत

**(२५) ३४५५ (२७-०४-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील सौंदे परिसर उपसा सिंचनामुळे मोठ्या प्रमाणावर ओलिताखाली आलेला असून या भागात ३३/११ के.व्ही. चे सात ते आठ उपकेंद्र असतानाही या उपकेंद्राना वीजेसाठी ३५ ते ४० किलोमीटर अंतरावर असलेल्या २२०/३३ के.व्ही. च्या जेऊर उच्च दाब केंद्रावर अवलंबून राहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सौंदे येथे १३२/३३ केंद्राकरीता जागा उपलब्ध असून संबंधित विभागाने सदर ठिकाणी १३२/३३ उच्चदाब सबस्टेशन बाबत प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास पाठविला असून, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदर प्रस्तावास मंजुरी मिळावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०३-२०२६) :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

मौजे सौंदे व लगतच्या परिसरात ३३/११ केव्ही क्षमतेच्या १४ उपकेंद्राद्वारे वीज पुरवठा करण्यात येत आहे. सदरच्या १४ उपकेंद्रांना २२०/३३ केव्ही जेऊर उच्चदाब उपकेंद्रातील ३३ केव्ही ०९ वाहिनीद्वारे विद्युत पुरवठा होतो. त्यापैकी ३३ केव्ही कंदर वाहिनीचे अंतर सर्वात जास्त असून त्याची लांबी २४.५ किमी आहे.

(२) हे खरे आहे.

सौंदे येथे प्रस्तावित १३२/३३ केव्ही उपकेंद्राकरीता जागा उपलब्ध असल्याबाबत तहसिलदार, करमाळा यांनी दिनांक ०६.०२.२०२४ रोजी कार्यकारी अभियंता, महापारेषण, सोलापूर यांना कळविले आहे. त्यानुषंगाने कार्यकारी अभियंता, महापारेषण, सोलापूर यांनी त्यांचे वरिष्ठ कार्यालयास जमिन तांत्रिक दृष्टया सुसाध्य असल्याबाबतचा अहवाल दिनांक २१.०२.२०२४ रोजी सादर केला आहे.

तसेच ग्रामपंचायत सौंदे यांनी मौजे सौंदे येथील गट क्र. ३२/१ व गट क्र. २ येथे शासकीय जागा उपलब्ध करुन देणेबाबतचा ग्रामसभेचा ठराव दिनांक ०५.०५.२०२५ अन्वये मंजूर केल्याचे कळविले आहे.

(३) सौंदे येथे १३२/३३ केव्ही नवीन उच्चदाब उपकेंद्र उभारण्यासाठी तांत्रिक सुसाध्यता पडताळणी करुन प्रस्ताव महावितरण कंपनीकडून दिनांक १६.०७.२०२५ रोजी महापारेषण कंपनीस सादर करण्यात आला आहे.

राज्य पारेषण उपक्रमाकडून महावितरण सांघिक कार्यालयाकडे दिनांक १०.११.२०२५ द्वारे उपकेंद्राच्या प्रणाली अभ्यास व तांत्रिक तसेच आर्थिक सुसाध्यता तपासणीसाठी आवश्यक सुधारित वीजभार मागविण्यात आला आहे. महवितवरण कंपनीकडून सुधारित वीजभार प्राप्त झाल्यानंतर राज्य पारेषण उपक्रमातर्फे प्रणाली अभ्यासाद्वारे उपकेंद्राची सुसाध्यता तपासून नियमानुसार योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात खुल्या प्रवर्गातील लोकांच्या उन्नतीसाठी राबविण्यात येणाऱ्या अमृत संस्थेबाबत

**(२६) ४२९४ (२७-०४-२०२५). श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने खुल्या प्रवर्गातील लोकांच्या उन्नतीसाठी अमृत संस्थेची स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संस्थेमार्फत कोणकोणत्या योजना राबविल्या आहेत व किती लोकांना त्याचा लाभ मिळाला आहे तसेच आतापर्यंत किती रुपयांचा निधी प्राप्त झाला असून किती खर्च करण्यात आला आहे,
(३) असल्यास, या संस्थेकरिता विविध सल्लागार नेमले असून सल्लागाराची नियुक्ती करण्याकरीता कोणती प्रक्रिया व निकष वापरण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर संस्थेचे कार्यकारी संचालक हे मनमानी कारभार करीत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. अतुल सावे (१३-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अमृत संस्थेमार्फत एमपीएससी व युपीएससी च्या परीक्षेकरीता अर्थसहाय्य करणे, आर्थिक विकासाकरिता स्वयंरोजगार व प्रशिक्षण कार्यक्रम, कृषी उत्पन्न आधारीत उद्योगकरीता कार्यक्रम, AIIMS, IIM, IIT IT विद्यार्थ्यांकरीता अर्थ सहाय्य देणे, अमृत वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजना, किशोरवयीन विकास उपक्रम, अमृत-कलश संगणक कौशल्य विकास कार्यक्रम, ड्रोन ऑपरेट प्रशिक्षण, इन्डो जर्मन टूल रूम प्रशिक्षण, राज्य व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद च्या शासकीय संगणक व टंकलेखन परीक्षा व ऑनलाईन लघुलेखन परीक्षा उमेदवारांना अर्थसहाय्य, बिझनेस इनक्युबेशन सेंटर योजना सुरू करणे, अमृत सुर्यमित्र प्रशिक्षण, आयात निर्यात प्रशिक्षण, आर्थिक साक्षरता कार्यक्रम, बेकरी प्रशिक्षण, अमृतपेठ, सी-डॅक अशा एकूण १८ योजना राबविल्या जातात. आज रोजी पर्यंत एकूण लाभार्थ्यांची संख्या-८७५५ इतकी आहे. तसेच सदर संस्थेस आज रोजी पर्यंत एकूण रु. १५९८०.८२ लाख इतका निधी प्राप्त झाला असून त्यापैकी रु. २३१४.६६ लाख निधी खर्च करण्यात आला आहे.
(३) मा.नियामक मंडळाच्या दिनांक १९.०४.२०२३ रोजीच्या बैठकी अन्वये सल्लागार समिती, निवड समिती किंवा इतर आवश्यक त्या कार्यासाठी आवश्यक त्या विषयांच्या समित्या नेमण्याचे व त्यांच्या वेळोवेळी बैठका घेणे याचा अधिकार व्यवस्थापकीय संचालक, अमृत यांना प्रदान करण्यात आलेला आहे. उक्त अधिकाराचा वापर करून व्यवस्थापकीय संचालक, अमृत यांनी विविध सल्लागार व्यक्तींची नेमणूक केली आहे.
सल्लागार नेमण्याकरीता, ज्या विषयाच्या अनुषंगाने समितीची स्थापना करण्यात आलेली आहे, त्या विषयांमधील विषयतज्ञ व्यक्तींना सल्लागार म्हणून नेमण्यात आलेले आहे. सल्लागार समितीच्या शिफारशी व इतर आवश्यक बाबींचा विचार करुन व्यवस्थापकीय संचालक, अमृत हे विविध विषयांवर निर्णय घेत असतात.
(४) व (५) अमृत या संस्थेमध्ये कार्यकारी संचालक अशा नावाचे पद उपलब्ध नाही. तथापि, सदर कार्यालयामध्ये व्यवस्थापकीय संचालक, अमृत, पुणे हे कार्यरत आहेत. उपलब्ध अभिलेखावरून त्यांच्या विरुध्द तक्रार प्राप्त नसल्याचे दिसून येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशिम जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांकडे वीज देयकाची रक्कम थकीत असल्याबाबत

**(२७) ४३४४ (२७-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम येथील नगरपरिषद प्रशासनाकडे ३ कोटी ४९ लाख २४ हजार ७६९ रक्कमेचे वीज देयक थकीत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासह जिल्हा मुख्यालयी असलेल्या इतरही अनेक प्रमुख शासकीय विभागांकडे कोट्यवधी रुपयांचे वीज देयक थकीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या वीज देयकांची वसूली थकीत शुल्कासह करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे,

अशा आशयाची बातमी दैनिक वृत्तपत्रात दिनांक ३१ जानेवारी, २०२५ रोजी प्रकाशित झाली होती. जानेवारी २०२५ अखेर वाशिम येथील नगरपरिषद प्रशासनाकडे रु.३.७१ कोटी रकमेचे वीज देयक थकीत होते. सप्टेंबर-२०२५ अखेर रु.३.८६ कोटी रकमेचे वीज देयक थकीत आहे.
(२) हे खरे आहे.

वाशिम जिल्हा मुख्यालयी असलेल्या प्रमुख शासकीय विभागांकडे जानेवारी २०२५ अखेर रु.५८.१९ लाख रुपयांचे वीज देयक थकीत होते. माहे सप्टेंबर-२०२५ अखेर रु. २९.२६ लाख रकमेचे वीज देयक थकीत आहे.
(३) थकबाकीबाबत शासकीय विभागाचा नियमाप्रमाणे महावितरण कंपनीमार्फत पाठपुरावा करण्यात येतो. सदर शासकीय ग्राहकांना दरमहा वीज देयक भरण्याची सूचना संगणकीय प्रणालीद्वारे पाठविण्यात येत असते. तसेच, वीज देयक वसुली करिता महावितरण कंपनीतर्फे थकीत वीज बिल ग्राहकांविरुद्ध विद्युत कायदा २००३ कलम ५६ (२) अन्वये कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिरुर (जि.बीड) तालुक्यात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून शेतकऱ्यांना शेती पंपाची नवीन जोडणी व रोहित्र देण्याबाबत

**(२८) ४५४५ (२५-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुर (जि.बीड) तालुक्यात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून शेतकऱ्यांना शेती पंपाची नवीन जोडणी व त्या भागाकरता तसेच तालुका व शहरासाठी ६३ के.व्ही. व १०० के.व्ही. नवीन रोहित्र देण्याचे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या शेतकऱ्यांना रोहित्र व शेतीपंपाची जोडणी देण्यात आली आहे, तेथील ओव्हरलोडमुळे जळण्याचे प्रमाण जास्त असल्याने तसेच सदरहू रोहित्र व शेतीपंपाची दुरुस्ती वेळेवर न केल्याचे निदर्शनास आल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे वेळोवेळी रितसर पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

शिरुर तालुक्यात सन २०२३-२४ व सन २०२४-२५ मध्ये एकुण ११९ कृषीपंपाना विद्युत जोडण्या देण्यात आल्या असुन आज रोजी एकही ग्राहक पारंपारिक पध्दतीने कृषीपंप वीज जोडणीसाठी प्रलंबित नाही. यापुढे कृषीपंप

वीज जोडणीसाठी “मागेल त्याला कृषी सौर पंप” योजनेचा लाभ घ्यावा या साठी कृषीपंप धारकांना प्रोत्साहित करण्यात येत आहे. शिरुर तालुक्यामध्ये सुधारीत वितरण क्षेत्र या योजनेच्या आधुनिकीकरण व प्रणाली बळकटीकरण या घटका अंतर्गत १०२ अतिरिक्त रोहित्रे, ०९ रोहित्र क्षमतावाढ इत्यादी कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. तसेच जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४, २०२४-२५ अंतर्गत १०० केव्हीए च्या ११ नविन वितरण रोहित्रांची व एक ६३ ते १०० केव्हीए रोहित्र क्षमतावाढ इत्यादी कामे पूर्ण झाली आहेत.
(२) हे अंशतः खरे आहे.

अतिरिक्त वीज भारामुळे व इतर तांत्रिक दोषामुळे रोहित्र नादुरूस्त होतात. तथापि नादुरूस्त रोहित्रे तात्काळ बदलुन देण्यात येत आहेत. शिरुर तालुक्यात सन २०२३-२४, सन २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये ३६३ रोहित्रे नादुरूस्त झाली होती. सदर सर्व ठिकाणची रोहित्रे बदलण्यात आली आहेत.
(३) मागेल त्याला सौरकृषी पंप व पी. एम. कुसुम घटक व योजनेंतर्गत शिरुर तालुक्यात महावितरणकडे वीज जोडणीसाठी प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांपैकी प्रधानमंत्री कुसूम घटक-ब योजनेंतर्गत एकुण ८३२ लाभार्थ्यांनी पैसा भरणा करुन त्यापैकी ८२१ सौर कृषीपंप स्थापित करण्यात आले आहेत. तसेच मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत शिरुर तालुक्यात ३९२४ लाभार्थ्यांनी पैशाचा भरणा करुन अर्ज सादर केले आहे. त्यापैकी ३६६६ अर्ज मंजुर करण्यात आले असून, ३०४८ लाभार्थ्यांनी पुरवठादरांची निवड केली आहे व आज रोजी २१९७ पंप आस्थापित झाले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महावितरण कंपनीअंतर्गत असलेल्या सार्वजनिक सेवेमधील ग्राहकांचा NSC योजनेमध्ये समावेश करणेबाबत

**(२९) ४६४८ (२५-०४-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महावितरण कंपनीमध्ये वीज ग्राहकांची NSC (New Service Connection) या योजनेंतर्गत घरगुती, व्यापारी, औद्योगिक या ग्राहकांची कामे कंपनीमार्फत केली जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यालय, महाविद्यालय, दवाखाने व शासकीय दवाखाने हे सार्वजनिक सेवेमध्ये येत असून, हे देखील जनतेच्या सेवेसाठी असल्याने त्यांना NSC (New Service Connection) या योजनेचा लाभ मिळत नसल्याने त्यांना स्वखर्चाने कामे करुन घ्यावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सार्वजनिक सेवेमधील विद्यालय, महाविद्यालय, दवाखाने, शासकीय कार्यालये यांचा NSC या योजनेमध्ये समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महावितरण कंपनीला आर्थिक वर्ष २०२५-२०२६ ते आर्थिक वर्ष २०२७-२०२८ या कालावधीकरिता शेतीपंपा व्यतिरिक्त इतर लघुदाब व उच्चदाब ग्राहकांना नवीन विद्युत जोड देण्यासाठीच्या भांडवली खर्चास तत्वत: मान्यता दिली आहे. या भांडवली खर्चाच्या योजनेस नवीन वीज जोडणी योजना NSC (New Service Connection) या नावाने संबोधण्यात येते.
(२) हे खरे नाही.

नवीन वीज जोडणी योजनेअंतर्गत घरगुती, व्यापारी, औद्योगिक व सार्वजनिक सेवा (विद्यालय, महाविद्यालय, दवाखाने व शासकीय दवाखाने) अशा शेतीपंपाव्यतिरिक्त इतर सर्व ग्राहकांना नवीन विद्युत जोड देण्यासाठी तसेच जादाचा विद्युतभार देण्यासाठी आवश्यक वीज वितरण जाळे उभारणीची कामे महावितरण कंपनीच्या खर्चाने करण्यात येतात.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील अनेक शासकीय कार्यालयाकडे विद्युत देयकाची थकबाकी असल्याबाबत

**(३०) ४९०६ (२५-०४-२०२५). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील अंदाजे ४६०८ शासकीय कार्यालयांकडे साडेसहा कोटी रूपयांची वीज देयकाची थकबाकी असल्याची माहिती माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सामान्य ग्राहकांनी वीज देयकाची रक्कम भरलेली नाही तर त्या ग्राहकांचे वीज पुरवठा तातडीने खंडीत केला जात आहे मात्र शासकीय कार्यालयाकडे कोट्यवधी ची थकबाकी असतांना सुध्दा वितरण कंपनीकडून कोणतीच कार्यवाही केली जात नाही, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, ज्या प्रमाणे सामान्य ग्राहकांवर कार्यवाही केल्या जाते त्याप्रमाणे वीज देयके थकीत असणाऱ्या शासकीय कार्यालयावर वितरण कंपनीकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलाबांची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०३-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे,
अशा आशयाची बातमी दिनांक ३१ जानेवारी, २०२५ रोजी दैनिक वृत्तपत्रात प्रकाशित झालेली होती.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) नागपूर जिल्ह्यांतर्गत शासकीय ग्राहकांच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील एकूण वीज बिल मागणी रु.११.८९ कोटी असून, यापैकी रु.१०.९२ कोटी वीज बिलापोटी महावितरणकडे भरणा केले आहेत.
तसेच, आज रोजी एकूण २५६३ शासकीय वीज ग्राहकांकडे रु.९.९५ कोटी थकबाकी आहे. थकबाकीबाबत शासकीय विभागाचा नियमाप्रमाणे महावितरण कंपनीमार्फत पाठपुरावा करण्यात येतो. सदर शासकीय ग्राहकांना दरमहा वीज देयक भरण्याची सूचना संगणकीय प्रणालीद्वारे पाठविण्यात येत असते. शासकीय ग्राहकांना शासनाकडून अनुदान उपलब्ध होत असते व निधी उपलब्धतेनुसार वेळोवेळी त्यांचेमार्फत वीज देयकाचा भरणा करण्यात येतो.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील कल्याण (पूर्व) येथील चिंचपाडा उपकेंद्राकरिता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३१) ४९४५ (२५-०४-२०२५). श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण (पूर्व) येथील चिंचपाडा १०० फुट रोड सर्व्हे क्र १४४ तसेच नांदिवली तलावाजवळ कोयला डेपो आर.टी.ओ. कार्यालयाजवळ २२/११ केव्ही उपकेंद्र प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावित उपकेंद्राच्या उभारणीकरिता ३००० चौ.मीटर जागेची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जागा उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ जानेवारी, २०२५ रोजी मा.उपमुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने प्रस्तावित उपकेद्राकरिता ३००० चौ.मीटर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

चिंचपाडा येथे सर्व्हे क्र. १४४ च्या गट क्र. ९ मधील एकूण क्षेत्र ५.२३ हे. आर पैकी ३००० चौ. मीटर क्षेत्रामध्ये २२/११ केव्ही, २x१० एमव्हीए क्षमतेचे वीज उपकेंद्र उभारण्याचे प्रस्तावित केले आहे. नांदिवली तलावाजळ कोयला डेपो आर.टी.ओ. ऑफिसजवळ उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आलेले नाही.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) प्रस्तावित उपकेंद्राकरीता ३००० चौ. मीटर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका तसेच तहसिलदार, अंबरनाथ यांना कळविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कडेगांव तालुक्यात (जि.सांगली) येथील पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना निवासस्थाने उपलब्ध असूनही तेथे वास्तव्याला येत नसल्याबाबत**

**(३२) ४९६९ (०८-०४-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कडेगांव तालुक्यात (जि.सांगली) येथे आठ पशुवैद्यकीय दवाखाने असून यापैकी देवराष्ट्रे, वांगी, चिंचणी व सोनसळ येथे काही वर्षापूर्वी शासनाने कोटयवधी रुपयांचा निधी खर्च करुन पशुवैद्यकीय दवाखाने तसेच पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी प्रशस्त इमारती उभ्या केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वांगी वगळता अन्य तीनही पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निवासस्थानामध्ये एकही दिवस अधिकारी व कर्मचारी वास्तव्याला आल्याचे दिसत नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) अंशतः खरे आहे.

सोनसळ येथील पद जुलै, २०२१ पासून रिक्त असल्यामुळे निवासस्थानात अधिकारी वास्तव्यास नाहीत. तसेच देवराष्ट्रे व चिंचणी येथील अधिकारी- निवासस्थाने नादुरुस्त असून राहण्यास अयोग्य आहेत. सबब देवराष्ट्रे

व चिंचणी येथील निवासस्थानामध्ये अधिकारी/कर्मचारी वास्तव्यास नाहीत. सदर निवासस्थानांची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने सन २०२५-२६ मध्ये याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषद, सांगली यांना सादर करण्यात आला आहे.
(४) विलंब नाही.

---

## मेळघाट (ता.धारणी, जि.अमरावती) येथील आदिवासी बहुंल दुर्गम भागात स्वतंत्र आगार निर्मिती प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत

**(३३) ५०७२ (२५-०४-२०२५). श्री.रवी राणा (बडनेरा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाट (ता.धारणी, जि.अमरावती) येथील आदिवासी बहुंल दुर्गम भागात स्वतंत्र आगार जागा निर्मितीच्या प्रस्तावास मंजुरी देऊन येणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात निधी मंजूर करून देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकप्रतिनिधी व यापूर्वी विभाग नियंत्रक परिवहन महामंडळ अमरावती यांनीही महाव्यवस्थापक नियोजन पणन राज्य परिवहन मुख्य कार्यालय वाहतूक भवन मुंबई यांना दिनांक १३ डिसेंबर, २०२३ रोजी प्रस्ताव पाठवला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०२-०३-२०२६) :** (१) व (२) होय
(३) व (४) सार्वजनिक खाजगी सहभाग अंतर्गत (PPP) धारणी येथे नवीन आगार बांधणी करता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारामार्फत सुसाध्यता तपासणी नुसार सदर प्रकल्प आर्थिक व्यवहार्य असल्यास आगार बांधणीसाठी शासन निधीची आवश्यकता भासणार नाही.

---

## मौजे कासोदा (ता. एरंडोल, जि. जळगाव) येथील शेतकऱ्यांच्या वीजेच्या समस्यांचे निवारण करण्याबाबत

**(३४) ५९०२ (२६-०४-२०२५). श्री.अमोल पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कासोदा (ता.एरंडोल, जि.जळगाव) येथील महावितरण विभाग सध्या प्रभारी असून, गेल्या काही महिन्यांपासून नियमित अभियंता नसल्यामुळे विद्युत पुरवठ्याचे नियोजन व्यवस्थित नसल्याने शेतकरी वर्ग त्रस्त झाला असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या तापमानात वाढ होत असून रब्बी पिकांना पाणी देणे आवश्यक आहे मात्र अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे विद्युत पुरवठा नियमित होत नसून, कमी दाबाचा विद्युत पुरवठा होत असल्याने विद्युत पंप काम करत नसल्याने रब्बी पिके धोक्यात आली आहेत. त्यामुळे कासोट्यात एका शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी अधिकाऱ्यांचा दबाव नसल्याने तसेच कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने वीज चोरीचे प्रमाण वाढले असून त्याचा परिणाम नियमित देयके अदा करणाऱ्या ग्राहकांवर होत असून, सदर समस्या सोडवण्याची

मागणी स्थानिक शेतकऱ्यांकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांच्या समस्यांचे निवारण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

मौजे कासोदा ता. एरंडोल, जि. जळगाव येथे तत्कालीन सहाय्यक अभियंता यांची बदली झाल्यामुळे माहे सप्टेंबर २०२४ पासून सदर पद रिक्त झाले होते. त्या पदाचा अतिरिक्त कार्यभार कनिष्ठ अभियंता उपविभागीय कार्यालय एरंडोल यांच्याकडे सोपविण्यात आला होता. तेव्हापासून सदर वितरण केंद्राचा कार्यभार ते सांभाळत होते व ते नियमितपणे आपली जबाबदारी पार पाडत होते. सध्या कासोदा कक्ष येथे दिनांक ०५.०८.२०२५ पासून सहाय्यक अभियंता या पदासाठी नियमित नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच मौजे कासोदा येथे विद्युत पुरवठ्याचे नियोजन व्यवस्थित नसल्याबाबत शेतकरी वर्गाची कोणतीही तक्रार महावितरण कंपनीच्या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

एरंडोल उप विभागात माहे एप्रिल २०२४ पासून ते आजपर्यंत वीजचोरी मोहिम राबविण्यात आलेली असून, त्या अंतर्गत १८२ ग्राहकांवर कारवाई करून रू. २२,०७,२८५/- वीजचोरीच्या दंडाची वसुली करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८-सी माजलगाव ते केज महामार्गावरील चोरंबा ते गावंदरा (जि.बीड) येथे विनापरवाना ३३ के.व्ही. उच्च दाबाचे विद्युत पोल उभारल्याबाबत

**(३५) ६०१५ (२६-०४-२०२५). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८-सी माजलगाव ते केज महामार्गावरील चोरंबा ते गावंदरा येथील रस्त्यालगत महावितरण कंपनीने विनापरवाना ३३ के.व्ही. उच्च दाबाचे विद्युत पोल उभारले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी उभारण्यात आलेल्या विद्युत पोलमुळे महामार्गावर मोठ्या प्रमाणात अपघात होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पोल तात्काळ काढून रितसर परवानगी घेऊन रस्त्याच्या मध्यापासून १५ मीटर लांबीवर विद्युत पोल उभारण्यात यावा, असे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी कार्यकारी अभियंता, महावितरण, धारुन यांना लेखी निवेदनाव्दारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने विनापरवानगी सदर महामार्गावर विद्युत पोल उभारणाऱ्या संबंधित ठेकेदार व महावितरणाच्या जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०२६) :** (१), (२), (३) व (४) ३३ केव्ही भोगलवाडी उपकेंद्र ते ३३ केव्ही अंबेवडगाव उपकेंद्र या ३३ के.व्ही. वाहिनीचे राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८-सी वरील चोरंबा ते गावंदरा दरम्यान उभारणी

करण्यात आली होती. परंतु, सदर वाहिनी कार्यान्वित करण्यात आली नव्हती.

सदर पोलचे रस्त्याच्या कडेपासूनचे अंतर हे १ ते १.५ मीटरच्या दरम्यान असल्याने अपघात होण्याची शक्यता नव्हती. तथापि, त्या दरम्यान कार्यकारी अभियंता, रस्ते विकास महामंडळ यांनी सदरचे ६ पोल रोडजवळ आल्याचे कळविण्यात आल्याने, सदरचे ६ पोल काढून सुरक्षित अंतरावर उभे करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोलेरा (पिंपरी) येथील विस्तारीकरण प्रकल्पात उकणी व वेकोली वणी गावातील प्रकल्पग्रस्त नागरिकांच्या पुनर्वसनाबाबत

**(३६) ६१७१ (२९-०४-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोलेरा (पिंपरी) येथील वेकोली वणी क्षेत्र निलजई डीप विस्तारीकरण प्रकल्पातील उकणी गावाचे पुनर्वसन आणि वेकोली वणी उत्तर क्षेत्रातील प्रकल्पात कोलेरा, आगासी व पिंपरी गावांचे पुनर्वसन प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच प्रकल्पग्रस्तांना पर्यायी रोजगार, पुनर्वसनाचा मोबदला व मूलभूत सोयीसुविधा (रस्ते, पाणी, वीज, आरोग्य सेवा, शिक्षण) उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पग्रस्त गावांचे पुनर्वसन कोणत्या ठिकाणी करण्यात येणार आहे तसेच पुनर्वसनासंदर्भात प्रकल्पग्रस्तांनी केलेल्या तक्रारी व मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या सर्व मागण्या मान्य करुन त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शंभूराज देसाई (०४-०३-२०२६) :** (१) उकणी गावाची पुनर्वसन प्रक्रिया सुरु आहे. तर, कोलेरा व पिंपरी गावाचे पुनर्वसन प्रलंबित आहे. आगासी गावात लोकवस्ती नसून, या गावातील जमीनी या पिंपरी गावातील ग्रामस्थांच्या असल्याचे, मे.वेस्टर्न कोलफिल्ड लि. च्या अहवालात नमूद आहे.

(२) कोल इंडिया च्या पुनर्वसन धोरणानुसार, पुनर्वसन प्रक्रिया राबविली जात असून, त्याअंतर्गत उकणी गावासंदर्भात, (अ) उपअधिक्षक भूमीअभिलेख कार्यालय, वणी यांचेमार्फत सर्वेक्षण झाले आहे. (ब) बेसलाईन सोशीओ इकॉनॉमीक सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. (क) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून, गावातील घरांचे मुल्यांकन पूर्ण झाले असून, यावर आक्षेप नोंदणीकरिता सदरचा मूल्यांकन अहवाल, ग्रामपंचायत कार्यालयात प्रसिध्द केला आहे. तर कोलेरा व पिंपरी गावाच्या पुनर्वसनाकरिता प्रक्रिया सुरु झालेली असून, त्याअंतर्गत भूखंड निवड, पात्र लाभार्थी यांचे दस्तऐवज घेण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे. वेस्टर्न कोलफिल्ड कं.ने वरील ३ गावांच्या हद्दीत ३६०.३० हे. जमीन अधिग्रहीत केली असून, आतापर्यंत २०६ वारसांना रोजगार तसेच १८ खातेदारांनी निवडलेल्या पर्यायानुसार त्यांना एकरकमी रु.५.०० लक्ष इतकी रक्कम अदा केलेली आहे.उकणी गावाचे पुनर्वसनासाठी वणी तालुक्यात, ब्राम्हणी-निळापूर येथे तर, कोलेरा व पिंपरी गावाच्या पुनर्वसनासाठी ब्राम्हणी येथे जागा निवडण्यात आलेली आहे. प्रकल्पग्रस्तांच्या तक्रारी व मागण्यांचे स्वरुप :

१) कोल इंडिया च्या पुनर्वसन धोरणानुसार गावाचे पुनर्वसन करणे.

२) पुनर्वसीत ठिकाणी नियमानुसार सर्व मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाने, सन २०१९ मध्ये केलेल्या सर्वेक्षणाची कट ऑफ डेट ठेवून, कोलेरा व पिंपरी

गावातील कुटुंबाना पीएएफ मिळवून अनुदान द्यावे.
(४) व (५) ग्रामस्थांच्या मागण्यांचा प्रस्ताव, कंपनीच्या सक्षम प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.

---

## खेड-आळंदी ( जि.पुणे ) येथील भीमाशंकर ज्योतिर्लिंग हे भारतीय पुरातत्व विभागाकडे वर्ग/अखत्यारित करण्याबाबत

**(३७) ६३३० (२७-०४-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशातील बारा ज्योतिर्लिंगापैकी बहुतांश ज्योतिर्लिंग हे भारतीय पुरातत्व विभागाकडे वर्ग /अखत्यारित आहेत त्याच धर्तीवर खेड–आळंदी (जि.पुणे) येथील भीमाशंकर ज्योतिर्लिंग देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त भीमाशंकर ज्योतिर्लिंग भारतीय पुरातत्व विभागाकडे वर्ग केल्यास केंद्र सरकारच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन शासन केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०७-०४-२०२६) :** (१) नाही, ही बाब सत्य नाही. बारा ज्योतिर्लिंगापैकी त्र्यंबकेश्वर व घृष्णेश्वर ही ज्योतिर्लिंगे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण या केंद्र शासनाच्या विभागांतर्गत केंद्र संरक्षित स्मारके आहेत. पुणे जिल्ह्यातील खेड-आळंदी येथील भीमाशंकर ज्योर्तिलिंग हे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण व राज्य पुरातत्व संचालनालयाच्या अधिनस्त संरक्षित स्मारक नाही. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने उक्त ज्योतिर्लिंग मंदिर हस्तांतरीत करण्याविषयी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांच्याकडे प्रस्ताव प्राप्त नसल्याचे कळविले आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील चाकण नगरपरिषदेमार्फत आयपीडीएस विदयुत वाहिन्या भूमिगत करण्याबाबत

**(३८) ६३३४ (२६-०४-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील चाकण नगरपरिषदेमार्फत आयपीडीएस विदयुत वाहिन्या भूमिगत करण्याबाबत प्रकल्प अहवाल महावितरण कंपनीकडून तयार करुन शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने याकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०२६) :** (१), (२) व (३) पुणे जिल्ह्यातील चाकण नगरपरिषदेद्वारे IPDS विद्युत वाहिन्या भूमिगत करण्याबाबत प्रकल्प अहवाल महावितरण कंपनीकडून शासनास सादर करण्यात आलेला नाही. दिनांक२०.०२.२०२५ रोजी सहाय्यक अभियंता, चाकण शहर शाखा यांनी चाकण नगरपरिषदेस, केंद्र सरकारच्या IPDS योजनेमध्ये चाकण नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये येणाऱ्या महावितरण कंपनीच्या उपरी लघुदाब व उच्चदाब

वाहिनी भूमीगत करण्याचे प्रस्ताव सादर करण्यासाठी व सदर कामाचे अंदाजपत्रक बनविण्यासाठी नगरपरिषदेमार्फत एजन्सीची नेमणूक करण्याबाबत पत्र महावितरण कंपनीमार्फत दिले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर वीज केंद्रातील संच क्रमांक नऊ बंद असल्याबाबत**

**(३९) ६५५७ (२६-०४-२०२५). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशातील सर्वात मोठा औष्णिक ऊर्जा केंद्रापैकी चंद्रपूर येथील महाऔष्णिक विद्युत केंद्रात मोठा स्फोट होऊन संच क्रमांक नऊ मध्ये आग लागल्याने संच बंद पडल्याची घटना माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०२-२०२६) :** (१) चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी संध्याकाळी १८:५५ वाजता संच क्र. ९ च्या जनित्रामध्ये (Generator) तांत्रिक बिघाड निर्माण झाल्यामुळे सदर संच बंद झाला. त्यावेळी स्फोट होणे, आग लागणे असा प्रकार झालेला नाही.
(२) महानिर्मिती कंपनीद्वारे उपरोक्त घटना घडल्यानंतर खालील तीन समित्यांमार्फत तपासणी करण्यात आली.
१. प्राथमिक तपासणी- अधिक्षक अभियंता, चाचणी विभाग, नागपूर.
२. जनित्राची अंतर्गत तपासणी (Internal Inspection)-मे. एनटीपीसीचे (M/s. NTPC) माजी कार्यकारी संचालक, श्री. बिमलेश कुमार सिंग.
३. तांत्रिक बिघाडाच्या मूळ कारणाचे विश्लेषण करणे-मुख्यालय स्तरावर चार सदस्यीय समिती.
उक्त समित्यांच्या निष्कर्षाप्रमाणे जनित्रामधील स्टेटर वॉटरच्या आकस्मिक घडलेल्या गळतीमुळे B-फेज अर्थ फॉल्ट उत्पन्न झाला, आणि परिणामत: जनित्र व त्याच्याशी संबंधित यंत्रणा बंद झाली.
(३) चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचा संच क्र. ९ जनित्राच्या स्टेटर व रोटर दुरुस्तीचे कामे पूर्ण करुन दिनांक ०१.०८.२०२५ रोजी १४:०७ वाजता पुन्हा कार्यान्वित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करमाळा शहरासह ग्रामीण भागातील रस्त्यांवर फिल्मी स्टाईलने दुचाकी चालविणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याबाबत**

**(४०) ६५८४ (०८-०४-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा शहरासह ग्रामीण भागातील रस्त्यांवर फिल्मी स्टाईलने दुचाकी चालविणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून रस्ते अपघातात मोठी वाढ झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) तसेच, वाहनांना विविध प्रकारच्या आवाजाचे हॉर्न लावण्यात येत असून त्या हॉर्नच्या आवाजाने ज्येष्ठ नागरीकांसह नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने अशा वाहनांचा तपास करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरीकांनी वाहतूक विभागाकडे वारंवार करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन वाहतूकीचे नियम मोडून सुसाट वाहने चालवणाऱ्यांवर व विविध आवाजांचे हॉर्न लावून ध्वनी प्रदुषण करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (२५-०३-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) वाहतुक शाखा, करमाळा ग्रामीण व शहर तसेच निर्भया पथक यांनी वाहतुकीसंदर्भात नियम मोडणाऱ्या व कर्कश हॉर्न वाजविणाऱ्या वाहनांवर कारवाई केली आहे.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकलूज कार्यालयाच्या वायूवेग पथकाद्वारे मोटार वाहन नियमांचा भंग करुन वाहतूक करणाऱ्या वाहनांवर नियमितपणे कारवाई केली जाते. माहे एप्रिल, २०२४ ते मे, २०२५ या कालावधीत कर्कश हॉर्न वाजविणाऱ्या ४६ दोषी वाहनांवर कारवाई करुन एकूण रु. १९ हजार इतका दंड आकारण्यात आला आहे. तसेच अतिवेगाने वाहन चालविणाऱ्या ५९ दोषी वाहनांवर कारवाई करुन एकूण रु. २१ हजार इतका दंड आकारण्यात आला आहे.

वाहतूक पोलीस ठाणे, करमाळा शहर व ग्रामीण यांच्याकडून सन २०२४ मध्ये कर्कश हॉर्न वाजविणाऱ्या ११ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून रु. ५५००/- तसेच सन २०२५ मध्ये ४० वाहनांवर कारवाई करुन रु. ३३०००/- दंड आकारण्यात आला आहे. माहे जानेवारी २०२६ या महिन्यात वाहतुक शाखा व निर्भया पथक यांनी वाहतुकीसंदर्भात नियम मोडणाऱ्या ७८ वाहनांवर कारवाई करुन रुपये १,८५,३००/- इतका दंड आकारला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील वसई पश्चिम पट्ट्यात भूमीगत विद्युत केबल पुरवठ्याच्या प्रस्तावाबाबत

**(४१) ६६९४ (२६-०४-२०२५). श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील वसई पश्चिम तसेच समुद्र किनारपट्टीतील नागरिकांना वारंवार वीज पुरवठा खंडीत होण्याच्या समस्येला सामोरे जावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याभागात वाढती लोकसंख्या व वीजेचे वाढती मागणी विचारात घेता या भागातील वीज वितरण वाहिन्या भूमीगत व सक्षमीकरण करण्यासाठी रुपये २११.५० कोटी रुपयाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असून आजतागायत प्रस्तावास मंजूरी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने प्रस्तावास मान्यता देऊन सोसाट्याच्या वाऱ्याने तसेच झाडाच्या फांद्या तूटून ओव्हर हेड वायरवर पडून होणारे अपघात टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०३-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पावसाळयात वादळी वाऱ्यामुळे झाडे ओव्हरहेड लाईनवर पडल्यामुळे कधी कधी वीजपुरवठा खंडित होतो. तथापि, महावितरण कंपनीचे कर्मचारी व सुचिबद्ध कंत्राटदार यांच्या मार्फत वीजपुरवठा तातडीने पूर्ववत करण्यात येतो.
(२) हे खरे नाही.
(३) १५ व्या वित्त आयोगाने मंजूर केलेल्या राज्य आपत्ती सौम्यीकरण निधीमधून राज्यातील आपत्ती सौम्यीकरणांतर्गत वसई तालुक्यातील वसई मंडळांतर्गत भूमीगत विद्युत वाहिनीची कामे करण्यासाठी शासन निर्णय

दिनांक०४ मार्च, २०२५ रोजी रक्कम रु. २११,५४,८२,०००/- (रु. दोनशे अकरा कोटी चौपन्न लाख ब्याऐंशी हजार) च्या प्रस्तावास मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार, कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्प अंतर्गत वसई-विरार समुद्र किनारपट्टीभागातील उपरी तार वाहिन्या भूमिगत करण्यासाठी निधी उपलब्धतेनुसार महावितरण कंपनीमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माथेरान-गिरीस्थान या पर्यटन स्थळाला चालना मिळण्यासह अद्यावत सोईसुविधा पुरविण्याबाबत

**(४२) ७१६३ (०७-०८-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माथेरान - गिरीस्थान (ता.कर्जत, जि.रायगड) पर्यटन स्थळाच्या विकासासंदर्भात विविध पर्यावरणवादी व काही व्यवसायीकांमुळे माथेरान वरील पर्यटन व्यवसायावर अवलंबून असलेल्या नागरीकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त थंड हवेच्या पर्यटन स्थळाला वर्षभरात देश-विदेशातून हजारो पर्यटन प्रेमी भेट देत असून स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पर्यटन स्थळावर जाण्यासाठी सोईसुविधा नसल्यामुळे पर्यटकांना अनेक अडचणीं निर्माण होत असून पर्यटकांची संख्या कमी होत असल्यामुळे त्याचा परीणाम छोटा-मोठा व्यवसाय करणाऱ्या व्यवसायीकांवर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन माथेरान-गिरीस्थान या पर्यटन स्थळाला चालना मिळण्याच्या दृष्टीने अद्यावत सोईसुविधा पुरविण्याबाबत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (२३-०३-२०२६) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नाही, हे खरे नाही.
(४) प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत माथेरान येथे मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी पर्यटन विभागामार्फत रु.५५१.२९ लक्ष रकमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन रु.२९४.२८ लक्ष इतका निधी माथेरान गिरिस्थान नगरपरिषद यांना वितरीत करण्यात आला आहे.

नगर विकास विभागामार्फत विविध योजनेंतर्गत माथेरान या पर्यटन स्थळाच्या ठिकाणी विविध विकास कामांसाठी रु.७८८५.३२ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता देऊन रु.४६९५.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

त्याचबरोबर सदर स्थळाच्या ठिकाणी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्या आर्थिक तरतूदीतून कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे येथील वागळे इस्टेट महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील उद्योगासाठी उच्च क्षमतेचे (ईएचव्ही) उपकेंद्र उभारण्याबाबत**

**(४३) ७२९७ (१९-०९-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील वागळे इस्टेट महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील उद्योगासाठी करण्यात येत असलेला वीजपुरवठा वारंवार खंडीत होत असल्याने येथील उद्योजकांना आर्थिक फटका सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी वागळे इस्टेटमध्ये उच्च क्षमतेचे उपकेंद्र (ईएचव्ही) उभारण्याची मागणी ठाणे स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनने मा.मुख्यमंत्री (ऊर्जा) यांचेकडे दिनांक २७ एप्रिल, २०२५ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ठाणे येथील उद्योजकांना येत असलेल्या अडचणींचा विचार करता वागळे इस्टेट महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील उद्योगासाठी उच्च क्षमतेचे (ईएचव्ही) उपकेंद्र उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) वागळे औद्योगिक वसाहतीमध्ये औद्योगिक कारखाने चालू असल्यामुळे वीजेची मागणी व वीज वाहिन्यांचे प्रमाण आवश्यकतेनुसार समप्रमाणात होते. तथापि, मागील काही वर्षामध्ये औद्योगिक कारखाने बंद होऊन बहुमजली व्यावसायिक इमारती उभ्या राहिल्यामुळे औद्योगिक वसाहतीमधील वीजेची मागणी अनेक पटीने वाढली आहे. अशा परिस्थितीमुळे एखादा फिडर काही कारणाने बंद पडल्यास त्या फिडरचा संपूर्ण भार इतर चालू फिडरवर घेण्याकरीता अनेक स्विचिंग ऑपरेशन करावी लागतात. त्यामुळे वीजपुरवठा काही मिनिटांकरीता बंद होऊन चालू होतो.

सदरची परिस्थिती टाळणेकरीता RDSS योजनेअंतर्गत वागळे इस्टेट औद्योगिक वसाहतीमध्ये दोन नविन फिडर टाकण्याचे प्रस्तावित केले आहे. त्याचबरोबर कैलास नगर, वागळे इस्टेट येथील वाढती विजेची मागणी विचारात घेता, सुरुवातीला ११०/२२ केव्ही क्षमतेचे उपकेंद्र उभारण्यास मंजुरी देण्यात आली होती. तथापि, दिनांक १५.०५.२०२५ रोजी महापारेषण आणि महावितरण यांच्यात झालेल्या समन्वय बैठकीत, वागळे इस्टेट परिसरातील भविष्यातील भार (Load) लक्षात घेता, सदर उपकेंद्राची क्षमता २२०/२२ केव्ही करणे तांत्रिकदृष्ट्या आवश्यक असल्यामुळे त्यानुसार महापारेषण कंपनीमार्फत प्रस्तावित केले आहे.

मे.टाटा पॉवर कंपनीने सदर ठिकाणी २२०/२२ के.व्ही. क्षमतेचे उपकेंद्र उभारण्याबाबत तयारी दर्शविली असून, त्यानुसार, दिनांक १४.११.२०२४ रोजी महापारेषण कंपनीस प्रस्ताव सादर केला आहे. सदर उपकेंद्रासाठी आवश्यक असलेल्या जागेच्या संपादनाची कार्यवाही मे.टाटा पॉवर कंपनीकडून सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वीज ग्राहकांच्या हितासाठी वीज देयकामध्ये कपात करण्याबाबत**

**(४४) ७४२६ (१९-०९-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ एप्रिल, २०२५ पासून पुढील पाच वर्षात वीज बिल कमी केले जाईल, असे आश्वासन मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक २८ मार्च, २०२५ रोजी विधानसभेत दिले असतांना देखील ग्राहकांना वाढीव दराची वीजबिले देण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र विज नियामक आयोगाने दिनांक २८ मार्च, २०२५ रोजी आर्थिक वर्ष २०२५-२६ दरम्यान महावितरणच्या घरगुती ग्राहकांसाठी विज शुल्कात ४% ते १२% कपात करण्याचा आदेश जारी केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यस्थान ७.५५ ते ८.९५ रुपये प्रति युनिट, मध्य प्रदेश ३.३४ ते ६.८० रुपये प्रति युनिट, कर्नाटक ५.९० रुपये प्रति युनिट सरसकट, तर महाराष्ट्र राज्यात ५.१६ ते १७.७९ रुपये प्रति युनिट दर इतर राज्यांच्यापेक्षा जास्त असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन वीज ग्राहकांच्या हितासाठी वीज देयकामध्ये कपात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही,

मागील वर्षांतील वीज दरवाढीचा ऐतिहासिक कल लक्षात घेता, महावितरण कंपनीने "प्रचलित पद्धतीने व्यवसाय (Business as Usual)" पद्धती अवलंबली असती तर, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये रु.९.४५ प्रति युनिट इतका सरासरी वीज पुरवठा दर, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये रु.१०.३२ प्रति युनिटपर्यंत व आर्थिक वर्ष २०२९-३० मध्ये रु.१४.६७ प्रति युनिटपर्यंत वाढलेला असता. परंतु महावितरण कंपनीने गेल्या अडीच वर्षात राज्याच्या वीज पुरवठ्यासाठी केलेल्या नियोजनामुळे आगामी पाच वर्षात कंपनीची वीज खरेदी खर्चात ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने त्याचा लाभ आगामी पाच वर्षासाठी महावितरण कंपनीमधील वीज ग्राहकांना देऊन वीज दरात कपात करण्याचे शक्य झाले. मा. वीज नियामक आयोगाने दिनांक२५.०६.२०२५ रोजीच्या आदेशाद्वारे पुढील पाच वर्षांकरिता सरासरी वीज पुरवठा दरामध्ये आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी २% ते आर्थिक वर्ष २०२९-३० साठी ९% कपात मंजूर केली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे, मा. वीज नियामक आयोगाने दिनांक २५.०६.२०२५ रोजीच्या आदेशाद्वारे घरगुती सरासरी वीज दरात १-१०० युनिट्स करिता आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंत १०.२०% ते २६.२९% पर्यंत ची घट मंजूर केली आहे. तसेच १०१-३०० युनिट्स करिता सरासरी वीजदरात आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२५-३० पर्यंत ०.४५% ते ४.६१% पर्यंतची घट मंजूर केली आहे. सुधारीत वीजदर हे १ जुलै, २०२५ पासून लागू आहेत.

(३) व (४) महाराष्ट्रातील ग्राहकांना लागू असलेल्या वीजदरांची इतर राज्यातील वीजदरांशी तुलना करतांना काही मूलभूत बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील ग्राहकांचे एकत्रीकरण (मिश्रण) व ग्राहकांचा भार, औद्योगिक व कृषीग्राहक यांचे प्रमाण, वीजेची उपलब्धता, वीजेचे नेटवर्क, तुलनेने मोठे भौगोलिक क्षेत्र इत्यादी विविध बाबींचा विचार करता, महाराष्ट्रातील वीजदराची इतर राज्याशी तुलना करणे संयुक्तिक होणार नाही. मा. वीज नियामक आयोगाच्या दिनांक २५.०६.२०२५ रोजीच्या आदेशानुसार राज्यातील सर्व वीज ग्राहकांचे

वीजदर कमी झाले आहेत.

तसेच, महाराष्ट्रातील औद्योगिक ग्राहकांसाठी मोठ्या प्रमाणात सवलती देण्यात आलेल्या असून, यामध्ये इलेक्ट्रिक आर्क फर्नेससह चालणाऱ्या उच्चदाब पोलाद उद्योगांसाठी उच्चदाब औद्योगिक वर्गवारीसाठी मंजूर केलेल्या मागणी आकाराच्या ७५% मागणी आकार, टाइम ऑफ डे नुसार दिवसा केलेल्या वीज वापरावर (Solar hours) लागू वीज आकाराच्या सरासरी २०%-२५% सवलत (आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३०), लोड फॅक्टर सवलत (१५% पर्यंत), वाढीव वीज वापर ०.७५ प्रति केव्हीएएच इतकी सुट, ठोक वीज वापर सवलत (रु.०.०७ प्रति युनिट ते रु.०.११ प्रति युनिट) लागू आहे. याव्यतिरिक्त,एका पाळीत चालणाऱ्या उच्चदाब औद्योगिक ग्राहकांना स्थिर आकारात सवलत (४०%) लागू आहे. तसेच, त्वरीत वीज बिल भरणा सवलत (१%) सुद्धा लागू आहे.

या सर्व सवलतीचा एकत्रित विचार केल्यास व ग्राहकाने वीज वापराचे सुनियोजन केल्यास औद्योगिक ग्राहकांचे सरासरी वीज देयक निश्चितच मोठ्या प्रमाणात कमी होणार असल्याने, परिणामी इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील औद्योगिक ग्राहकांचे वीजदर समकक्ष ठरतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील ग्रामस्थांना अखंडित स्वरुपात वीज पुरवठा करण्याबाबत

**(४५) ७४७० (१९-०९-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भाग, आदिवासी पाडे, वस्ती, किनार पट्टी भाग तसेच नगरपरिषदेच्या हद्दीत वीज पुरवठा खंडीत स्वरुपात सुरु असल्याने येथील नागरिक तसेच डायमेकरचे लघुउद्योग त्रस्त झाले असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने येथील लघुउद्योग व ग्रामस्थांना अखंडित स्वरुपात वीज पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

माहे एप्रिल २०२५ मध्ये पालघर लघु मंडळाअंतर्गत मान्सूनपूर्व देखभाल दुरुस्ती व नियोजित कामांमुळे, तसेच काही टिकाणी वीज वाहिन्यांवरील तांत्रिक बिघाडामुळे विद्युत पुरवठा काही ठिकाणी खंडीत झाला होता.

(२) व (३) पालघर लघु मंडळाअंतर्गत एकूण २२७ उच्चदाबाच्या वीज वाहिन्याद्वारे औद्योगिक, शहरी व ग्रामीण भागास विद्युत पुरवठा करण्यात येतो. माहे एप्रिल २०२५ मध्ये महावितरण मध्ये सुरू असलेल्या आरडीएसएस प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या कामांकरीता तसेच पूर्व मोसमी देखभाल दुरुस्तीकरीता वीज वाहिन्यावरील विद्युत पुरवठा नियोजन पध्दतीने काही काळासाठी बंद करण्यात आला होता. त्याव्यतिरिक्त काही वीज वाहिन्यावर तांत्रिक बिघाड झाल्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला होता. खंडीत झालेला वीज पुरवठा तांत्रिक बिघाड दुरूस्त करुन पुन्हा सुरळीत करण्यात आला आहे.

महावितरणच्या पालघर लघुमंडळाअंतर्गत RDSS Modernization या योजनेअंतर्गत ३३/११ केव्ही नवीन उपकेंद्र एकूण ११, उपकेंद्र रोहित्र क्षमता वाढ एकूण १०, नवीन उपकेंद्र रोहित्र ०३, नवीन वितरण रोहित्र-३९३, वितरण रोहित्राची क्षमता वाढविणे ३७५, उच्चदाब वाहिनी- ५७१ किमी, लघुदाब वाहिनी-२०७ किमी अशी सुमारे ८०५.३३ कोटी इतक्या रकमेची कामे प्रस्तावित केली आहेत. आरडीएसएस Loss Reduction Scheme

योजनेअंतर्गत रु.८४.१५ कोटी रक्कमेची कामे मंजूर झाली असून, त्यापैकी रु.५९.९९ कोटी रक्कमेची कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित कामे सुरु आहेत.

एमआयडीसी वीज यंत्रणा बळकटीकरण योजनेअंतर्गत पालघर तालुका मध्ये नवीन अल्याळी येथे उपकेंद्राचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यात भूमिगत विद्युत वाहिनी टाकण्यासह नियमित वीज पुरवठा करण्याबाबत

**(४६) ७५१४ (१४-०८-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात विविध भागांमध्ये पडलेल्या मुसळधार पावसामुळे सुमारे २०० खांब जमीनदोस्त झाल्याने वीज वितरणाला मोठया प्रमाणात अडथळा झाला असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी उच्च दाबाच्या ९.५ km विजेच्या वाहिन्या, लघुदाबाच्या ७.६ किलोमीटर वीज वाहिन्या कोसळून याने मोठ्या प्रमाणावर महावितरणाचे नुकसान झाल्यामुळे येथील सर्वसामान्य वीज ग्राहकांना वीज नसल्याने सदर प्रकरणी शासनामार्फत भूमिगत वीज पुरवठा करण्याच्या प्रकल्पाकरीता ५ हजार कोटी रुपयांचा कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील वीजेचा समस्या दिवसेंदिवस वाढत असून वीज पुरवठा करणाऱ्या विद्युत तारा जीर्ण, विजेचे खांब मोडकळीस आलेले व लोंबळकळणाऱ्या विद्युत तारा, उघडे ट्रान्सफार्मर याची दुरुस्ती देखभाल वेळेवर न होणे इत्यादी कारणामुळे वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्यामुळे विजेवर चालणारे व्यवसाय पुर्ण:ता धोक्यात आले असून आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असल्यामुळे अनेक उद्योग येथून स्थलांतरीत होण्याच्या मार्गावर आहेत

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संपूर्ण पालघर जिल्ह्यात भूमिगत विद्युत वाहिनी टाकण्यासह वीजेच्या समस्या कायमस्वरुपी सोडवून नियमित वीज पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

माहे-मे २०२५ मध्ये वादळीवारा व मुसळधार पावसामुळे एकूण उच्चदाब वाहिनीचे २०६ खांब व लघुदाब वाहिनीचे एकूण ५७२ खांब उन्मळून पडले होते. सदरचे काम महावितरण कंपनीच्या Breakdown Maintenanace मधील Empanelment Agency द्वारे त्वरीत करण्यात आले. पालघर (लघु) मंडळाअंतर्गत Empanelment Agency द्वारे माहे-मे, २०२५ मधील पावसामुळे बाधीत उच्चदाब वाहिनी २०६ पोल व लघुदाब वाहिनीचे ५७२ खांबांची उभारणी करुन वीजपुरवठा तात्काळ सुरळीत करण्यात आला.

(२) हे खरे नाही.

(३) विक्रमगड उपविभागाअंतर्गत औंढे येथे ३३/२२ केव्हीचे उपकेंद्र असून सदर उपकेंद्राला २२०/३३ केव्ही अतिउच्चदाब विराज उपकेंद्रातून ३३ केव्ही वाहिनीव्दारे वीजपुरवठा केला जातो. पालघर लघुमंडळात देखभाल दुरुस्तीसाठी सन २०२५-२६ करीता रु. २६ कोटी इतक्या रक्कमेची आर्थिक तरतूद मुख्य कार्यालयाकडून करण्यात

आली आहे. तसेच महावितरण कंपनीचे कर्मचारी व सूचिबध्द कंत्राटदारामार्फत देखभाल व दुरुस्तीची कामे वेळोवेळी करण्यात येतात.

RDSS योजनेअंतर्गत ७२.५ कि.मी. एबी केबल उभारण्यात आले असून १३ कि.मी. २२ केव्ही वीज वाहिनीचे सक्षमीकरणाचे (Conductor Augmentation) काम पूर्ण करण्यात आले तसेच २.१३ कि.मी. ३३ केव्ही वीज वाहिनीचे सक्षमीकरणाचे (Conductor Augmentation) काम सुध्दा पूर्ण करण्यात आले आहे.

(४) पालघर जिल्ह्यातील किनारपट्टी परिसरातील कोकण आपत्ती सौम्यीकरण योजनेअंतर्गत बोईसर, पालघर, डहाणू व सफाळे या उपविभागामध्ये अनुक्रम ५९.३३ कोटी, ३३.७५ कोटी, ५७.२० कोटी व ४९.२४ कोटी असे एकूण १९९.८५ कोटी रुपयांची भूमिगत वीज वाहिनी उभारणीची कामे प्रस्तावित आहेत. सदरचे काम हे शासन निर्णय दिनांक २४.०१.२०२४ अन्वये मंजूर करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील विक्रोळी पूर्व विभागात एसटी डेपो उभारण्याबाबत

**(४७) ८२७५ (०६-१०-२०२५). श्री.सुनील राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांजूर, विक्रोळी, भांडूप, मुलुंड याठिकाणी मोठ्या प्रमाणात कोकणवासीय राहत असल्याने सणासुदीच्या काळात गावी जाण्याकरिता त्यांना कुर्ला किंवा सायन याठिकाणी जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विक्रोळी पूर्व विभागात सिग्नल येथे एसटी डेपो उभारण्याबाबतची मागणी प्रवांशानी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन मागणीच्या अनुषंगाने विक्रोळी पूर्व विभागात एसटी डेपो उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०८-०४-२०२६) :** (१) श्री. गौरी गणपती, होळी सणानिमित्त कांजुर, भांडुप, विक्रोळी या भागातील कोकणात जाणाऱ्या प्रवाशांकरिता ग्रुप बुकींगची सोय करण्यात येते व त्यांनी मागणी केलेल्या ठिकाणापासुन बससेवा उपलब्ध करुन देण्यात येते.

(२) मा.श्री.सुनील राऊत, विधानसभा सदस्य यांनी दिनांक १९.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली आहे.

(३) व (४) रा.प.कुर्ला-नेहरुनगर ते विक्रोळी (पुर्व) सिग्नल अंतर ९.० कि.मी. असुन विक्रोळी ते ठाणे खोपट आगार अंतर १२.० कि.मी इतके आहे. विक्रोळी (पुर्व) सिग्नल येथे नव्याने एस.टी. डेपो आगार उभारणे संयुक्तिक तसेच व्यवहार्य होणार नाही.

---

## मुंबईतील आरे कॉलनी, गोरेगांव (पूर्व) येथे आरे बचाव आंदोलनातील तरुणांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत

**(४८) ८३२३ (१९-०९-२०२५). श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरे कॉलनी, गोरेगांव (पूर्व) येथे आरे बचाव आंदोलन उभारले असतांना या आंदोलनात सहभाग घेतलेल्या तरुणांवर गुन्हे दाखल करण्यात आले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्हे तरुण मुलांवर केल्यामुळे त्यांच्या पुढील वाटचालीकरिता अडचणीचे होणार असल्याने सदर गुन्हे तात्काळ रद्द करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयाकडे दिनांक १५ एप्रिल, २०२५ रोजी पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने गुन्हे तात्काळ रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०२६) :** (१) आरे पोलीस ठाणे येथे खालीलप्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

१) गु. र. क्र.३४५/२०२२
२) गु. र. क्र.३४६/२०२२
३) गु.र.क्र.२२/२०२२
४) गु.र. क्र.३१/२०२२

(२) होय, हे खरे आहे.
(३) शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक २०.०९.२०२२ नुसार राजकीय व सामाजिक आंदोलनातील ज्या गुन्ह्यांमध्ये दिनांक ३१.०३.२०२२ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झालेले व उक्त शासन निर्णयामध्ये नमूद निकषांची पूर्तता होत आहे असे खटले मागे घेण्याबाबत कायदेशीर तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी क्षेत्रिय समित्या गठित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तसेच शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक ३१.०७.२०२४ अन्वये दिनांक ३१.०८.२०२४ पर्यंत दोषारोपपत्रे दाखल होतील, असे खटले उक्त दिनांक २०.०९.२०२२ च्या शासन निर्णयात नमूद अटी व शर्तींच्या अधिन राहून मागे घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुषंगाने शासन पत्र दिनांक १०/०६/२०२५ अन्वये पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना उक्त दिनांक २०.०९.२०२२ व दिनांक ३१.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार सदर प्रकरणी उचित कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना देण्याबाबत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१२, मुंबई यांच्या दिनांक ०१.१२.२०२५ रोजीच्या पत्रात आरे मेट्रो कार डेपो विरोधी आंदोलन हे राजकीय व सामाजिक संघटनांकडून झालेले असून, नमूद घटनेच्या अनुषंगाने सन २०२२ मध्ये आरे पोलीस ठाणे येथे १) गु. र. क्र.३४६/२०२२, २) गु. र. क्र.२२/२०२२ व ३) गु. र. क्र.३१/२०२२ या गुन्ह्याच्या अनुषंगाने दाखल खटले मागे घेण्याबाबत मान्यता दिल्याने उक्त परिमंडळातंर्गत क्षेत्रिय समितीद्वारे खटले मागे घेण्याबाबत पोलीस सह आयुक्त, कायदा व सुव्यवस्था, मुंबई यांना दिनांक २५.०८.२०२५ अन्वये अहवाल सादर केल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच गु. र. क्र.३४५/२०२२ या गुन्ह्याचा अनुषंगाने दाखल खटला मागे घेण्यासंदर्भात संबंधित समितीपुढे अहवाल ठेवण्यात आल्याचे उक्त पत्रात नमूद करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## दिव्यांगासाठी मानधन वाढवून देण्याबाबत तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी पाच टक्के निधी खर्च करण्याबाबत

**(४९) ८४४५ (१३-१०-२०२५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लाखोंच्या संख्येने दिव्यांग राहत असून त्यांना केवळ रुपये १५००/- इतके मानधन दिले जाते परंतु तेही वेळेवर देण्यात न येणे, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिव्यांगासाठी पाच टक्के निधी खर्च करावा असे शासनाचे बंधन असतांना शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी केली जात नसल्याचे दिनांक २९ मार्च, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून दिव्यांगासाठी अनेक कल्याणकारी योजनांची घोषणा करण्यात आलेली असली तरी अद्याप या योजना राबविण्यात येत नसल्याचेही त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिव्यांगासाठी राजस्थान, केरळ राज्यासह इतर अनेक राज्यात देण्यात येत असलेल्या धर्तीवर राज्यातील दिव्यांगांना वाढीव मानधन देण्यात यावे व स्थानिक स्वराज्य संस्थांवर ५ टक्के निधीचा खर्च करण्याचे बंधन घालण्यात यावे अशी मागणी दिव्यांगाकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१८-१२-२०२५) :** (१) अंशतः खरे आहे.

शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना राबविण्यात येते. विभागाच्या दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजनेमधून रक्कम रुपये २५००/- इतके मानधन दिले जाते.

शासनाच्या ग्राम विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक २५ जून, २०१८ व नगर विकास विभागांच्या शासन निर्णय दिनांक १० मे, २०१८ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांना दिव्यांगासाठी ५% निधी खर्च करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

तसेच सदर ५% निधी संपूर्णपणे त्याच आर्थिक वर्षात खर्च करण्याबाबत सचिव, दिव्यांग कल्याण यांच्या दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या अर्धशासकीय पत्र आणि दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील सर्व ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सुचना देण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

शासनाकडून दिव्यांगाच्या कल्याणार्थ खालील वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येतात.

**i. दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरवणे**.- या योजनेकरीता सन २०२३-२४ मध्ये एकूण रुपये १४,७३,०००/- इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

**ii. दिव्यांग व्यक्तींच्या स्वयंरोजगारासाठी बीजभांडवल देणे.**- या योजनेकरीता रुपये सन २०२३-२४ मध्ये एकूण रुपये २,७७,५२,५००/- व सन २०२४-२५ मध्ये एकूण रुपये १,६४,४५,५००/- इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

**iii. दिव्यांग व अव्यंग व्यक्तीच्या विवाहास प्रोत्साहन देणेकरीता आर्थिक सहाय्य देणे**.- या योजनेकरीता सन २०२३-२४ मध्ये एकूण रुपये ६,१५,००,०००/- व सन २०२४-२५ या वर्षामध्ये एकूण रुपये ४,४०,५०,०००/- इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

**iv. शालांत परिक्षोत्तर (मॅट्रिकोत्तर) शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे**- या योजनेकरीता सन २०२३-२४ मध्ये एकूण रुपये ११,१३,०५,९९१/- व सन २०२४-२५ मध्ये एकूण रुपये ११,७८,७९,३२४/- इतका निधी खर्च करण्यात आला.

**v. शालांत पुर्व (प्री-मॅट्रीक) शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.**- या योजनेकरीता सन २०२३-२४ मध्ये एकूण रुपये ६,६७,८९,०००/- व सन २०२४-२५ मध्ये एकूण रुपये ३,५४,८०,६००/- इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

**(३)** अंशतः खरे आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून दिनांक २०.०८.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना राबविण्यात येते. सदर योजनेमधून दिव्यांग लाभार्थ्यांना रक्कम रुपये १५००/- इतके मानधन दिले जात होते.

परंतु, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात रुपये १५००/- वरुन रुपये २५००/- इतकी वाढ करण्यात आलेली असून सदर वाढ माहे, ऑक्टोंबर २०२५ पासून डी.बी.टी पोर्टलद्वारे लाभार्थ्यांना देण्यात येत आहे.

तसेच, स्थानिक स्वराज्य संस्थांवर ५% टक्के निधी दिव्यांगांसाठी खर्च करण्याचे बंधन घालण्यात यावे अशी मागणी करण्यात आल्याचे निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही. तथापि, शासनाच्या ग्राम विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक २५ जून, २०१८ व २६ मे, २०२० आणि नगर विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७, दिनांक १० मे, २०१८, दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांना दिव्यांगासाठी ५% निधी खर्च करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(५०) ८६०९ (०७-०८-२०२५). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी यांची २७९८ पदे पशुधन विकास अधिकारी (गट- ब) यांची २६२ व सहायक पशुधन विकास अधिकारी पशुधन पर्यवेक्षक यांची २६३० पदे व पशुधन पर्यवेक्षकांची तब्बल ३४०० पदे गत वर्षापासून रिक्त असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी महाराष्ट्र राज्यात ५० हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा डिप्लोमा करुन पशुसंवर्धन विभागातील भरतीच्या प्रतिक्षेत असून अनेक विद्यार्थ्यांची भरतीसाठीची वयोमर्यादा संपत आली असल्याने त्यांच्या बेरोजगारीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने सरळसेवा पदभरतीने सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) संवर्गाची ३०८ रिक्त पदे व पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २७९५ रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आले असून लोकसेवा आयोगाकडून जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.तसेच पशुधन पर्यवेक्षक या पदाची रिक्त पदे भरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.